# शीलं परं भूषणं. ”

## विद्यार्थ्यांकरितां नाटिका.

“ ज्ञान हेंच वित्त जगीं सर्व सौख्यदायी, ।
शील हीच शक्ति खरी भंग जिला नाहीं; ॥
ज्याला हीं लब्ध दोन धन्य तो लोकीं, ।
स्वर्ग, धरा एक त्यास जाहली विलोकीं ! ॥


लेखक

**नारायण वामन टिळक.**


**आवृत्ति ४ थी.**

१९३४


मुद्रक व प्रकाशक

**शंकर नरहर जोशी**, चित्रशाळा प्रेस, १०२६

सदाशिव पेठ, पुणें,

यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

कि. ८४ आणे.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत
सातारा

# धन, ज्ञान आणि शील.

SHRI.CHA.PRATAPSINH
MAHARAJ (THORALE)
NAGAR WACHNALAYA, SATARA
6663

… १ ला.

स्थळ — अण्णासाहेबांचा दिवाणखाना.

**अण्णा०**:–( हातांत एक पत्र घेऊन येतात. पत्राकडे निरखून पाहून तिरस्कारानें ) ऊं: ! ह्यांत काय अर्थ आहे ? हें कोणीं तरी शंखशिरोमणीनें उगाच डोकें खाजवून आमच्या खिशांतून चार पैसे निघाले तर काढावे, म्हणून हें महाकाव्य करून आम्हांला नजर केलें आहे ! ह्या बेट्यांना लोकांचा पैसा म्हणजे सडकेवरच्या मूठभर धुळीसारखा वाटत असतो. एखादा मंत्र म्हणून दाखवावा, आशीर्वाद द्यावा, एखादी कविता करून पाठवावी, एकदोन चिजा म्हणून दाखवाव्या, कांहीं तरी सोंग करावें आणि उपटावे लोकांपासून पैसे ! घ्या म्हणावें ह्या अण्णासाहेबांपासून कोण काय घेतां तें ! कोण आहे रे तिकडे ? नाऱ्या, ए नाऱ्या.

**नाऱ्या**:–( लगबगीनें येऊन ) जी धनीसाप !

**अण्णा०**:–बेट्या धनीसाप का धनीसाहेब ?

**नाऱ्या**:–ब–र ! माझ्या बाच काय जातया ! धनीसा–प.

**अण्णा०**:–तूं तरी काय करशील ? जमिनींत पुरलेल्या डबोल्याचा मालक मेला म्हणजे साप होऊन त्याचें संरक्षण करीत त्यावर बसून रहातो म्हणतात, तसाच मी तुला वाटत असलों तर ! जा, मी तसाच आहें, आणि तसाच रहाणार; पण मरेपर्यंत मात्र. मी निपुत्रिक नाहीं. मरतांना हेंच डबोलें आपल्या पुत्राच्या हवालीं करण्याला हा उदार, दानशूर, दयानिधि अण्णासाहेब सदा सिद्ध आहे ! बरं जा, धनीसापाच्या पिल्लाला पाठवून दे.

**नाऱ्या**:—जी धनीसाप. ( नाऱ्या जातो. )

**अण्णा०**—( पुन्हा पत्राकडे पाहून आश्चर्यानें ) अरे, हें तर निनांवी पत्र आहे ! बहार झाली ! आतां मात्र आपण शंखशिरोमणि नसून कविशिरोमणि आहांत खरे ! आतां आपल्या ह्या श्रमाबद्दल आपल्याला एक लाख रुपयांची निनांवी हुंडी लिहून द्यायला हरकत नाहीं ! ( इतक्यांत पिल्या प्रवेश करतो. त्याला पाहून ) कायरे ए मूर्खा, तुला कोणीं सांगितलें इकडे यायला ?

**पिल्या**:—जी धनीसाप, नाऱ्याजीनं.

**अण्णा०**:—( मोठ्यानें हंसून ) खूब शहाणा आहे एकूण तुझा तो नाऱ्याजी. बरं तुझी तरी अक्कल पाहूं. जा, माझ्या पिल्लाला पाठवून दे.

**पिल्या**:—आन् दिलाच पाठवूनश्यान तर बकशीस काय घेताल धनीसाब ?

**अण्णा०**:—जा, नीघ, चघळपणा करूं नको. काम बरोबर न केलंं तर दोन रुपये दंड ! केलंस तर तो माफ ! समजलं बक्षीस ! चल, नीघ येथून.

**पिल्या**:—ह्यो न्याय तर बघा. ( चरफडत निघून जातो. )

**अण्णा०**:—हें जग सगळें चोरांनीं भरलें आहे. बिदागी, बक्षीस, इनाम, नजराणा, साह्य, भीक, शेवटीं एक प्रकारची मजुरीसुद्धां, हीं सारीं चोरीचींच दुसरीं नांवें आहेत ! आपण जर एखादा शब्दकोश बनविला तर त्यांत ठासून असेंच नमूद करूं !

( बाळ्या घाईघाईनें प्रवेश करून )

**बाळ्या**:—मग द्या तर लौकर चार रुपये मला. तो शब्दकोश जरूर पाहिजे.

**अण्णा०**:—कोणता ?

**बाळ्या**:—कोणता म्हणजे ? माझ्यासारख्या सातवी इयत्ता शिकणाऱ्या मुलाला जो लागत असेल तो !

नालय) सातारा



**अण्णा०**:—कोशाची कांहींएक गरज नाहीं. चार रुपये म्हणजे झालं काय ! वेड लागलंय् तुला !

**बाळ्या**:—मला, का मला शाळेंत घालणाराला ?

**अण्णा०**:—अगदीं खरं बोललास ! तुला शाळेंत जाऊन करायचं काय ? तुला काय कमी आहे ? तुझ्यासाठीं मीं आपल्या हाडांचीं काडें करून ही इतकी संपत्ति मिळवून ठेवली आहे, ती का तूं कारकुन्या कराव्यास म्हणून ? जळो ती शाळा ! आणि ती फी आणि बुकें ! आपण तर बाबा उठावणीस आलों ह्या रिकाम्या खर्चानें ! ह्या सुमित्ररावाच्या नादीं लागून मीं हा मूर्खपणा केला ! शाळेंत जाण्यानें तूं आपल्या बापाला मात्र उलटून बोलूं लागलास; दुसरें कांहीं नाहीं. धन असल्यावर ज्ञानाचें करावयाचें तरी काय ? बस्स झालें तुझें तें शिकणें आतां !

**बाळ्या**:—देव पावला ! येथें कोणाला ती शाळेची कैद हवी होती ? पण बाबा, तुम्हीं मला कां बोलावणं पाठविलं होतं ?

**अण्णा०**:—हें घे, वाच पाहूं हें पत्र.

**बाळ्या**:—वाहवा जीवा ! ही तर कविता आहे. हूं तर बरं, ही आमच्या नव्या नाटकाच्या उपयोगीं पडेल का ?

**अण्णा०**:—हं, वाच लवकर.

**बाळ्या**:—वाचूं का गाऊन दाखवूं ?

**अण्णा**:—गाऊन दाखव.

**बाळ्या**:—नुसती कां हावभावासुद्धां ?

**अण्णा०**:—बाळ्या, तूं शुद्धीवर आहेस का ? तूं कोणाशीं बोलत आहेस ? कोणापुढें आहेस ? थोडा तरी विचार कर.

**बाळ्या**:—क्षमा करा; पण मी ही कविता हावभाव करून गाऊन दाखविणार.

**अण्णा०**:—नीघ येथून ! हो चालता ! कारट्या, आज आठदहा

वर्षं शाळेंत जाऊन मला खर्चीत पाडून तूं इतकेंच शिकलास वाटतें? चल, दे तें पत्र इकडे आणि चालता हो !

**बाळ्या:**—आतां कसचा जातों हें नाटक केल्यावांचून.

**अण्णा०:**—कर नाटक ! हा मीच चाललों. ( जातो. )

**बाळ्या:**—जगांतून गेला तरी असल्या कृपण माणसावांचून जग ओस पडणार नाहीं !

**चाल**—" होईल कलह म्हणोनी "

**श्रीमंताच्या पोटीं !**
**जन्मुन मजसम नाहिं भिकारी ॥ ध्रु० ॥**
**एक मनींची हौस फिटेना ।**
**करुनी माझी पुरती दैना ।**
**सांठवि धन म्हातारा ।**
**मूर्खपणाची सीमा भारी ॥ १ ॥**

माझ्या अंगावर गुंजभर सोनें नाहीं; कां ? तर चोर माझा खून करतील म्हणून ! मला कधीं सुग्रास अन्न नाहीं; कां ? तर गोड खाऊन माझी प्रकृति बिघडेल म्हणून ? चांगल्या कपड्यालत्त्यांचा माझ्या शरीरास कधीं विटाळ नाहीं; कां ? तर केव्हांतरी फाटून जाणाऱ्या क्षणभंगुर पदार्थाकडे अविनाशी लक्ष्मीचा व्यय होऊं नये म्हणून ! शाळेंत होतों तर असा त्रास ! यंदाचें पुस्तक पुढच्या वर्षीं चालायचं नाहीं, म्हणून तें विकत घ्यायचं नाहीं. लोकांजवळ दांत विचकले म्हणजे मी नम्र, मनमिळाऊ होईन म्हणून गणिताकरितां, डिक्शनरीकरितां मला दारोदार फिरायला लावायचें ! मला काटकसर करतां यावी, म्हणून माझ्या हातांत स्टेशनरीसाठीं साडेतीन पैसे पडायचे ! बरं झालं, उद्यांपासून शाळा सुटली हें. आतां म्हातारा आहे आणि मी आहे ! होऊं द्याच तर आतां दोन हात ! कोण हटतें पाहूं. आपण शहाण्या बापाचे लेक ! घरचे पैसे घालवून आपण कांहीं करणार नाहीं;

आधीं आपण नाटक कंपनी काढणार. मग काय ! आपली हौस फिटून शिवाय बुधवार, शनवार चांदरात झडणार. काढायची तर स्त्रीनाटक कंपनी काढायची ! ती तर बहारच होईल.

चालः—" अर्धतनु वारुळी "

स्वयें इंद्र मी होइन ! माझ्या सुंदर त्या अप्सरा ।
धन्य मी ! धन्य जगीं ह्या खरा ॥ ध्रु० ॥
गंधर्वांचा वृंद त्यासवें स्वर्गच मग ही धरा ॥
वेड मी लाविन नारीनरां ॥
धनराशी पडतिल माझ्या पायांपुढें ।
प्रत्यक्ष कुबेरा पडेल मग सांकडें ।
मज मिळेल सुख जें स्वर्गीं नच सांपडे ! ।
नाट्यकलानिपुणांत खरोखर ठरेन मग मी हिरा ।
धन्य मी ! धन्य जगीं ह्या खरा ! ॥ १ ॥

हें तर ठरलंच ! आपले वसंतराव, रंगराव, श्रीकृष्णराव कमी नाहींत ! ह्या गंधर्वांना स्वर्गींच्या अप्सरासुद्धां वश होतील. मग पृथ्वीवरचा नुसता पैसा पाहून धावणाऱ्या अप्सरांची बिशाद काय ! त्या तर नाचतच पुढें येतील. असो; ह्या विषयाची चर्चा एकट्यानें करून उपयोग नाहीं. आपले हे अष्टप्रधान जमवून ह्याचा निकाल लावला पाहिजे. अरे हो ! अगदींच विसरलों ! बाबांना कोणींतरी थट्टेखोर कवीनें पाठविलेली ही कविता तशीच हात-तल्या हातांत राहिली. पाहूं पाहूं, हे कविकुलगुरु काय म्हणतात तें:—

चाल—" म्हातारा इतुका "

बघ पैशाचे खेळ ॥
अवघे हे पैशाचे खेळ ॥ ध्रु० ॥

खरंच बाबा कविराया ! अक्षरशः खरं ! रंगरावासारख्या काटकसर करणाऱ्या, अत्यंत प्रामाणिक मनुष्याच्या अंदाजाप्रमाणें आमचें हें

नाटक नुसतें उभें करायला वीस हजार, नऊशें नव्याण्णव रुपये, पंधरा आणे, नऊ पै पाहिजेत ! खरोखरच.

**बघ पैशाचे खेळ ॥**
**अवघे हे पैशाचे खेळ ॥ ध्रु० ॥**

बरं पुढें ?

**पैशावांचुन कार्य कराया धांवे तो नर जाण ॥**
**केवळ वेडा ! राज्य स्वप्निचें मानी व्यर्थ प्रमाण ॥**
**अवघे हे पैशाचे खेळ । बघ पैशाचे खेळ ॥**
**अवघे बघ पैशाचे खेळ ॥ १ ॥**

पण मी कांहीं तसा वेडा नाहीं; माझें तरी हें स्वप्नांतलें राज्य नाहीं ! वीस हजार, नऊशें नव्याण्णव रुपये, पंधरा आणे, नऊ पै म्हणजे माझ्या हातचा मळ आहे. तेवढी बाबांच्या हातांतली खजिन्याची किल्ली माझ्या हातांत आली म्हणजे झालें. माझे अष्टप्रधान यालाही कांहीं तरी तोड काढतील ! आणखी काय म्हणतात हे कविराज---

**पैशावांचुन पदोपदीं हा दुःखद हो संसार ।**
**नवल न; धर्महि तयावांचुनी न पडे केव्हां पार ॥**
**अवघे हे पैशाचे खेळ । बघ पैशाचे खेळ ।**
**अवघे बघ पैशाचे खेळ ॥ २ ॥**

ह्याचा तर अनुभव आपल्याला पावलोपावलीं येत आहे. माझा संसार म्हणजे सध्यां माझ्या एकट्यापुरताच ! तरी ह्या असल्या कवडीचुंबक बापाशीं गांठ पडल्यामुळें मला कितीतरी त्रास होत आहे ! तसाच मी धर्म तो काय करणार ? माझा धर्म म्हणजे आपल्या चार गरीब मित्रांना साह्य करणें इतकाच. पण श्रीमंत बापाचे भिकारी पुत्र आम्ही ! आमच्या स्वतांच्या खर्चाची जर बोंबाबोंब तर आपल्या हातून दुसऱ्याला साह्य तें कसें आणि

कितपत होणार? वरांत लहानसहान चोऱ्या करून काय घडेल तितकेंच ना? खरें आहे कविराज, पैशावांचून धर्महीं नाहीं खराच.

**वेडा म्हणतील म्हणोत मजला परि पैसा मत्प्राण ॥ भुक्ती मुक्ती अवघे पैसा पैसा ब्रह्मज्ञान ॥**

हें मात्र आपल्याला लागू नाहीं. पैसा माझा प्राण नाहीं. ह्या जगांतल्या सर्व सुखांचा उपभोग हीच माझी भुक्ति. आणि ह्यांत अणुरेणुइतका व्यत्यय नसणें ही माझी मुक्ति. ही मुक्ति मिळावी म्हणून डोक्याचा उपयोग करीत असणें, हें ब्रह्मज्ञान. आणि हें सारें पैशानें होणार म्हणून; पैसा माझा जीव कीं प्राण! ह्यापलीकडे माझ्या बाबतींत, कविराया, तुमच्या म्हणण्यांत अर्थ नाहीं. बाबांना मात्र तुमचे हे दोन चरण चांगले लागू पडतात. हे तुमचे चरण म्हणजे पाय म्हणजे लाथाच तुम्हीं त्यांना मारल्या आहेत. ह्या शेवटच्या दोन लाथा मात्र त्यांना नजर करण्यासारख्या आहेत. जाऊं द्या ह्या त्यांच्या त्यांच्याकडे! कोण आहे रे तिकडे?

**पिल्या**:—जी सरकार!

**बाळा०**:—हे सारेच बेटे मला म्हणतात सरकार आणि बाबांना म्हणतात धनीसाप! एकदां रंगरावाला ह्याचा अर्थ विचारला पाहिजे. बरं पिल्या, ही कविता बाबांना नेऊन दे आणि त्यांना सांग कीं, आपल्याला आपल्या लेकाचं गाणं आवडलं नाहीं तर नाहीं; आतां कृपा करून हें गाणं गाण्याकरतां कोणी तरी फक्कडच माणूस आणा.

**पिल्या**:—ह्य इतक मसनी काय उमगतया सरकार? जरा लिखूनशान घेताल तर ठीक व्हईल बगा.

**बाळा०**:—बरं जा, हा कागद घेऊन.

**पिल्या**:—सरकारची वानी कशी अक्शी बगा गुलावानी गुलचाट!

बाळा०:—पहा, ह्या अडाणी माणसानेंसुद्धां माझी परीक्षा केली. माझ्यासारख्यानें नाटकच करावें! हें घे पिल्या, जा. ( त्याला रुपया देतो. पिल्या लवून मुजरा करतो आणि रुपया वाजवीत जातो. )

बाळा०:—अरे हो ! आपले अष्टप्रधानांची यायची वेळ झाली वाटतं. ( खिशांतलें घड्याळ काढून पाहतो. ) चार वाजून सतरा मिनिटें झालीं. आणखी तेरा मिनिटांनीं ते येतील. त्यांना मीं ह्याच दिवाणखान्यांत यायला सांगितलं आहे, नाहीं का ? बसा तर मग येथेंच तेरा मिनिटें माशा मारीत. ( विचार केल्यासारखें करून व टाळी वाजवून ) बस्स ! हीच युक्ति करावयाची. ह्याच युक्तीनें आपण हें घड्याळ मिळवलं नाहीं का !

चाल—" फटक्याची "

**रडरड रडलों ! रुसून बसलों ।**
**सर्व दिवसभर उपवासी ॥**
**भलतें वदलों खुशाल हंसलों ।**
**जो आला जवळी त्यासी ॥ ध्रु० ॥**
**वैद्यबुवा अपुले केले ।**
**साह्याला धांवत आले ।**
**बघुनी नाडी ते वदले ।**
**इष्ट वस्तु आणून द्या कशी । आधीं जाउनी रोग्यासी ॥**
**नाहीं तर संतापवायूनें क्षणांत मृत्यु ने यासी ॥ १ ॥**

अशा युक्तीनें जर घड्याळ मिळालें तर नाटकाप्रीत्यर्थ वीस हजार, नऊशें, नव्याण्णव रुपये, पंधरा आणे, नऊ पै ह्याच युक्तीनें कां मिळणार नाहींत? बस्स ! हीच युक्ति करावयाची आणि ही नच साधली तर ? तर काय आपले अष्टप्रधान सांगतील तें करून पाहायचं. अरे, आले वाटतें ते ! पण ह्या वेळेस बाबा कुठें असतील? ( इतक्यांत पिल्या येतो. )

पिल्या:–सरकार, विष्टापरधान आल्येती.

बाळा०:–हा बेटा मोठा गुलाम आहे ! माझ्या मित्रांना मी लडिवाळपणानें अष्टप्रधान म्हणतों, हें ह्याला कसं समजलं पहा ! बरें पिल्या, बाबा कुठें आहेत रे ?

पिल्या:–त्ये तर वाद्धळ झालया बगींत बसूनश्यान बाहेर गेल्याती.

बाळा०:–बरं झालं गेली एकदांची पीडा. जा, पाठवून दे आमच्या अष्टप्रधानांना; पण त्यांना विष्टा म्हणूं नको. अष्टप्रधान म्हणत जा.

पिल्या०:–असत् परधान, असत् परधान. (म्हणत म्हणत जातो व वसंतराव, रंगराव, श्रीकृष्णशास्त्री, पंचूनाना, धोंडोपंत, गुलाबसिंग, केरोपंत, कोंडोपंत प्रवेश करतात व कोणी नमस्कार, कोणी गुड-मॉर्निंग करून एकच गोंधळ करितात. )

बाळा०:–हा घ्या, तुम्हांला सर्वांना मिळून मी एकच दंडवत घालतों. ( हंसत हंसत सपशेल उताणा पडून नमस्कार करतो. ) ( सारे खो खो हसतात व " हा कोणत्या मुलुखाचा दंडवत, " " ह्याला म्हणावें विनोद, " "शाबास बाळासाहेब ! खूप केली!" ह्याप्रमाणें कोणी कांहीं, कोणी कांहीं एकदम म्हणतात व असाच कल्लोळ करीत असतां कोणी कोचावर, कोणी खुर्चीवर, कोणी टेबलावर बसतो. )

बाळा०:–खामोश ! बी क्वाएट. ( सर्व पुन्हां हंसतात. ) हंसाच तर मग.

कांहीं बोलुं नका ! हसा ! रे! हसा हसा रे हसा हसा !
हि हि हि हि हि ! हि हि हि हि हि !
कामधाम सोडून बसा ! परि हसा हसा रे हसा हसा !
हि हि हि हि हि ! हि हि हि हि हि !

हंः हंः हंः हंः हंः हंः हंः हंः हि हि हि हि हि ! हि हि हि हि हि !

**सर्वजणः**—खः खः खः खः खः खः हि हि हि हि हि हि ! हि हि हि हि हि !

**रंगरावः**—( मोठ्यानें ) खामोश ! चूप ! बी क्वाएट.

**वसंतरावः**—टु आर्डर.

**बाळा०**:— बिझिनेस प्लीज. ( सर्व गप्प होतात. ) तुम्हांला आधीं मी एक आनंदाची बातमी सांगतों.

**रंगरावः**—आपल्या कपाळची शाळेची कटकट चुकली हीच ना !

**बाळा०**:—तुम्हांला कोठून समजली हो ही बातमी ?


**रंगरावः**—कोठून समजली ! पृथ्वीच्या पोटांत जरी कांहीं घडत असलें तरी तें ह्या रंगरावाला समजणार. मला थट्टा मुळींच आवडत नाहीं, हें तर तुम्हांला ठाऊकच आहे. तसाच मी किती नम्र आहे, आत्मस्तुति म्हणजे मला कशी विषाचा घोट घेण्यासारखी आहे, हें पण तुम्हाला माहीत आहे;तरी नाइलाजामुळें अज्ञ जनांला आपली योग्यता आपल्याच तोंडानें कधीं कधीं सांगावी लागते, ही गोष्ट परम खेदजनक होय. पण करायचें काय तुम्हां मूढांपुढें—?

श्लोक.

**त्रिकालज्ञ मी ! मी गुणी ज्ञानमूर्ती**
**न माझी जरी या जगामाजि कीर्ती ।**
**खनीमाजि या रत्न मी झांकलेलें ।**
**महापुण्य कीं हें तुम्हां लब्ध झालें ॥ १ ॥**

**वसं०**:—वा ! तर ! आपली योग्यता काय सांगावी ? खरोखरच आपण एक रत्न आम्हांला प्राप्त झालां आहां.

**श्रीकृष्ण०**:—मी तर कृष्णच ! मी तर तुम्हांला सांगतों जें आहेत्ते "मुनीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ॥" म्हणजे पूर्वजन्मीं



रंग०:—बरोबर आहे त्यांचें म्हणणें. मीं सगळा प्रोग्रॅम करून आणला आहे. [ पृ. ११

सातारा.

जे योगी असतात, ते योगापासून भ्रष्ट झाले असतां जे आहेत्ते मुनींच्या नाहीं तर श्रीमंतांच्या उदरीं जन्मास येतात जे आहेत्ते. अतएव जे आहेत्ते रंगराव भटाचा म्हणजे जे आहेत्ते मुनीचा पुत्र आणि बाळासाहेब जे आहेत्ते श्रीमंताचे श्रीमंत पुत्र! म्हणजे जे आहेत्ते पूर्वीचे योगी आणि आतांचे जे आहेत्ते बुद्धीचे खंदक.

**धोंडो०**:—ह्या बुद्धीलाच उपजतबुद्धि म्हणतात.

**केरो०**:—उपजतबुद्धि पशूच्या बुद्धीला म्हणतात.

**कोंडो०**:—अशी देईन एक श्रीमुखांत ठेवून! कोण रे पशु?

**गुलाब०**:—तुम लोग सब हैवान है! बालासाब, मेरा थोडा सुन लेवो.

**बाळा०**:—नीट शुद्ध मराठींत बोला म्हणजे ऐकतों.

**गुलाब०**:—हम सुध मराठी मे बोलते! सुनो. तुम्ही मेरा कहेना यहीही हैं के आतां काम करावी.

**रंग०**:—बरोबर आहे ह्यांचें म्हणणें. मीं सगळा प्रोग्रॅम करून आणला आहे.

**बाळा०**:—पाहूं, पाहूं तो.

**रंग०**:—ऐका, मी वाचून दाखवितों.

आपल्या कंपनीचें नांव " रंभा–गंधर्व संगीत नाटक मंडळी " हें असावें. ह्या कंपनीचें भांडवल मिस्टर रंगराव शंकर भोळे ह्यांनीं अगदीं बारकाईचा हिशेब करून ठरविल्याप्रमाणें वीस हजार नऊशें नव्याण्णव रुपये, पंधरा आणे, नऊ पै असावें. सर्व भांडवल श्रीमंत बाळासाहेब उडवे ह्यांनीं पुरवावें. कोणीं रूपानें, कोणीं वाणीनें, कोणीं गाण्यानें. आपण एकंदर नऊ गंधर्व आहोंच. इतक्याच रंभा असल्या म्हणजे आपली कंपनी बनली. ह्या रंभा आणण्याच्या कामावर वसंतराव आपाजी मोहपाडे, श्रीकृष्णराव पुरुषोत्तम काळे व गुलाबसिंग जनानासिंग ह्यांची नेमणूक व्हावी. कंपनीचे म्यानेजर मिस्तर रंगराव शंकर भोळे असावे व मालक अर्थात् बाळासाहेब

उडवे आहेतच. भांडवल उभारण्याच्या कामीं मी श्रीमंतांना मदत करीनच आणि तीही निरिच्छ बुद्धीनें करीन. कारण—

श्लोक.

सोंगें घेउन नाचणें अधमता द्रव्यार्थ वाटे मला ।
सेवाया रसिकां परंतु जन हा सोत्कंठ हो जाहला ॥
त्रैगुण्योद्भवमत्रलोकचरितं नानारसं दृश्यते ।
नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनम् ॥ १ ॥

बाळा०:—शेवटल्या दोन चरणांचा तेवढा अर्थ सांगाल तर बरें होईल.

रंग०:—हं ! सांगा शास्त्रीबुवा तेवढा पाहूं.

श्रीकृष्ण०:—वाः ही तर तुम्ही आमची परीक्षाच घेत आहां ! घ्या बाबांनो ! त्रैगुण्योद्भवमत्र म्हणजे जे आहेत्ते ह्याच भांडवलाला तिहींनीं गुणलें असतां मात्र, कचरितं म्हणजे कचरतील, नानारसं म्हणजे जे आहेत्ते नानासाहेब किंवा बाळासाहेब ! दृश्यते म्हणजे असें दिसतें. नाट्यं म्हणजे जे आहेत्ते नाटक, भिन्नरुचेः म्हणजे जे आहेत्ते भिणाऱ्यांचें, जनस्य माणसांचें, अतएव जे आहे त्ते तिप्पट खर्च होतो म्हणून जे आहेत्ते भिणाऱ्या माणसाचें जे आहेत्ते. पुढच्याचा अर्थ जे आहेत्ते नाटक कंपनी उभारण्याचें जे आहेत्ते काम नाहीं जे आहेत्ते.

बाळा०:—रंगराव, आम्हांला संस्कृत येत नाहीं म्हणून तुम्हीं असें आम्हांला टोंचून बोलावें, हें चांगलें दिसतें का तुम्हांला ? तिप्पट ! चौपट ! दसपट ! सारी इस्टेट गेली तरी हा बाळासाहेब एकदां काम हातीं घेतल्यावर मागें हटणार नाहीं, समजलांत ?

रंग०:—अहो, पण हा ह्या श्लोकाचा मुळींच अर्थ नाहीं. श्रीकृष्णरावानें ही नुसती थट्टा केली आपली ! ह्याचा अर्थ असा आहे. हा लोक पाहिला तर तीन गुणांचा आणि निरनिराळ्या

रसांनीं युक्त दिसतो. ह्यांत एक रुचि नाहीं. ह्याला हें आवडतें तर त्याला तें आवडतें, अशा सर्व लोकांचें मनोरंजन करणें असल्यास बहुतकरून नाटकानें होईल.

**बाळा०**:—तरी मला वाटलेंच, कीं रंगराव! आणि मला असें टोंचून कधींच बोलणार नाहींत.

**धोंडो०**:—ह्यांत काय संशय?

**बाळा०**:—बरं, आतां बाबांची यायची वेळ झाली. आतां भेट—

**सर्वजण**:—हं! समजलों, समजलों.

**केरोपंत**:—दिनशाच्या दुकानाकडे ना?

**बाळा०**:—होय, तिकडेच. गुड नाईट.

**सर्वजण**:—गुड नाईट. ( सर्व जातात. )

**बाळा०**:—रंगराव, थांबा. आपण दोघे आपल्या टांग्यांत थोडा फेरफटका करून येऊं. ( रंगराव परत येतो. ) चला, आपण तबेल्याकडेच जाऊं. ( हातांत हात घालून जातात ).

————

# अंक २ रा.

( रंगरावाचें घर. )

**टपालचा शिपाई**:—आतां येथें काय मिळतें कोणाला ठाऊक? एका घरीं एका बाईनें चटकन दोन रुपये काढून दिले, तर दुसऱ्या घरीं एका तरुणीनें जणूं काय मींच हिचा पति मारला, असें समजून कानांनीं ऐकवणार नाहींत, असले भयंकर शाप दिले! काय, जगांतल्या सर्व उलाढाल्यांचे, बऱ्यावाइटाचे, सुखदुःखाचे कर्ते आणि हर्ते आम्ही टपालचे शिपाईच आहोंत काय? असें दिसतें खरें! निदान बायकांना तरी असें खास वाटतें. पुरुषांना सुद्धां वाटतें. पण तें बायकांनीं वेड लावलेल्या पुरुषांना मात्र. असो; आपल्याला काय त्याचें! कोणी हसो, कीं रडो; टपालचा बटवडा करून ताबडतोब मोकळं व्हावयाचं, इतकंच आपलं काम. तेवढं करावं म्हणजे आपल्या जन्माचें सार्थक झालें. ( टपालच्या थैलीवर हात मारून ) या थैलींतील जादू थैलीलाच ठाऊक! [ मोठ्यानें ] टपाल. (रंगराव बाहेर येऊन टपाल घेतो व टपालचा शिपाई जातो.)

**रंगराव**:--( पत्र मनाशींच वाचतो व जसजसा मजकूर येईल, तसतसा तो क्रमानें आनंदाचे, चिंतेचे, भीतीचे, समाधानाचे चेहेरे करतो. ):—

खरोखर दैवाची लीला अगाध आहे! दैव कसलं? हा सृष्टिक्रम अगाध आहे! तो तरी कसला? हा रंगराव शंकर भोळे अगाध आहे. ( पुन्हां पत्राकडे पाहून व आनंदानें मान डोलवून व टाळी वाजवून ) "रचिला ज्याचा पाया त्याची बरी उभारणी झाली." ( चुटकी वाजवून ) किल्ला तर रचला, आतां त्याचा

कबजा घेण्याला उशीर करितां कामा नये ! बाळासाहेबाला काय कळतंय् म्हणा ! लक्ष्मीपुत्रच ते. तरी असले लक्ष्मीपुत्र जगांत असण्याची गरज मात्र फार आहे. नाहींतर माझ्यासारख्या योग्य, सत्पात्र, उद्योगी, पराक्रमी, परोपकारी, सकल साधुजनांचा गुरु म्हटलें असतां चालेल, अशा महापुरुषांचें जर लक्ष्मीवांचून अडेल तर ती त्यांच्याकडे धाडणार कोण ? बाळासाहेबांसारखे गृहस्थ—गृहस्थ कसले ! एक पुच्छ-विषाणहीन पशू—म्हटलं म्हणजे आम्ही एका भल्या भक्कम दगडी पुलाप्रमाणें समजतों. पुराणिकांच्या मतें लक्ष्मी ही समुद्राची कन्या. म्हणजे माझ्या हातांत आज जी लक्ष्मी आली आहे, ती अण्णा-साहेबरूपी महासागरांतून बाळासाहेबरूपी दगडी पुलावरून रंग-रावरूपी महाविष्णूच्या चरणीं येऊन दाखल झाली आहे. आतां हा महाविष्णु तिला माहेराचें तोंड दाखवतोय् कशाला ! परंतु इतकं खरं, कीं ह्या महाविष्णूला, त्या महालक्ष्मीला घेऊन सातां समुद्रांपलीकडे जाऊन चार पांच वर्षें श्रीशेषशायी भगवान् बनलें पाहिजे. बरं, पण आज अजून आमच्या गरुडाची स्वारी कां बरं नाहीं येत ? हा आलाच वाटतें. ( श्रीकृष्ण प्रवेश करतो. त्यास पाहतांच हांसत हांसत त्याच्याजवळ जाऊन त्याच्या गळ्यांत हात घालून आणून आपल्याजवळ बसवितो व हातांतील पत्र आंग खाजविण्याचें मिष करून कपड्यांत टाकतो. ) ( श्रीकृष्णाकडे पाहून ) अगदीं वेळेवर आलांस ! मी हा आतांच तुझ्याकडे येणार होतों. बरं शास्त्रीबुवा, आतां एका क्षणाचा विलंब लावतां कामा नये. नाटकाला लागणारें भांडवल तर तयार झालें.

**श्रीकृष्ण०**:—काय, म्हणतोस काय ! पहा बाबा ! हें जे आहेत्ते उलट्या तंगड्या गळ्यांत यायचें लक्षण दिसतें. उद्यां तुरुंगांत जायची वेळ आली तर आपण जे आहेत्ते—

**रंग०**:—( हसून ) हूं. सांगा ! सांगा ! जायचं ना तुरुंगांत तशीच वेळ आलीच तर ?

**श्रीकृष्ण०**:—आपण जाल कां ?

**रंग०**:—अलबत् ! आधीं ती तयारी केली तेव्हांच तर ह्या कामाला हात घातला.

**श्रीकृष्ण०**:—काय, तुरुंग ! तुरुंग ! तुरुंगांत जायला तूं तयार आहेस ? तूं खरोखर उलट्या काळजाचा आहेस बाबा !

**रंग०**:—आणि आपण? आण्णासाहेबांनीं तर तुला आणि मला दोघांना विश्रांतिसदन दाखवावयाचा विचार केला आहे !

**श्रीकृष्ण०**:—पण मीं काय केलें? प्रोग्रॅमप्रमाणें भांडवल उभारणारा त्यांचाच मुलगा नाहीं का ? आणि तूं मॅनेजर नाहींस का ?

**रंग०**:—होय, तो आपला प्रोग्रॅम ! आण्णासाहेबांच्या प्रोग्रॅमप्रमाणें तूं गुन्हेगार नंबर वन् आणि मी तुझा साथी ठरलों आहे.

**श्रीकृष्ण०**:—पण मीं केलें काय ?

**रंग०**:—तें पोलीस सांगतील.

**श्रीकृष्ण०**:—काय पोलीस ? ( इकडे तिकडे पाहून ) अरे हो, ते आलेच पहा इकडे ! रंगराव, मला ह्या वीस हजारांतला एक रुपया नको जे आहेत्ते.

**रंग०**:—जे आहेत्ते वरचे नऊशें रुपये पाहिजेत जे आहेत्ते.

**श्रीकृष्ण०**:—( दूर डोकावून पाहून ) अरे, ते आले. हे पहा तुझ्या पायां पडतों. ते नऊशें पण तूंच घे.

**रंग०**:—बरं, वरचे नव्याण्णव ?

**श्रीकृष्ण०**:—ते तूंच घे, वरचे आणे, पै सारें घे. हे माझ्या खिशांतले पावणे दोन रुपये पण घे; हा आंगरखा घे; हें धोतर घे; पण माझे आई, जगदंबे ! मला जे आहेत्ते ह्या संकटांतून सोडीव ! ( पोलीस आलेला पाहून ) अरे आला ! ( थरथर कांपत सुटतो. )

**रंग०**:—भिऊं नको. तूं असाच बेधडक मागल्या दारानें निघून जा आणि आणखी एक वर्षभर ह्या गांवांत येऊं नको. हें भांडवल.

पचलेंच, तर हा रंगराव तुला कदापि विसरणार नाहीं. हूं आटप.

**श्रीकृष्ण०**:—हा निघालों! आजपासून तूंच माझा मायबाप. रंगराव, मला वांचीव; ह्या आपल्या अनन्यशरणांगत दासाला वांचीव. ( जातो. )

**पोलीस**:—रामराम. झाला का आमचा अर्ज लिहून ?

**रंग०**:—होय, बसा अंमळ. ( पोलीस बसतो व रंगराव पडद्यांत जाऊन अर्ज घेऊन बाहेर येतो. ) हा घ्या; मीं तुम्हांला वाचून दाखविलें, त्याचीच ही चांगली नक्कल केली आहे; घेऊन जा ही. पण नाईक, एक काम आहे बुवा लहानसें; आतां येथून गेलेला मनुष्य पाहिला का तुम्हीं ?

**पोलीस**:—होय. श्रीकृष्णराव कीं नाहीं ?

**रंग०**:—होय, तोच. कसें तरी करून आज संध्याकाळपर्यंत त्याला एकदोनदां भेटा. नुसतें त्याच्या दारावरून गेलांत तरी पुरें.

**पोलीस**:—ठीक आहे. रामराम.

**रंग०**:—रामराम. (पोलीस जातो) चला, ह्या अजागळ शाह्ण्याची तर चांगलीच बोळवण झाली म्हणायची. ( पत्र काढून वाचतो. ) शाबास! वसंतराव गृहस्थ प्रामाणिक खरा! आणि खटपटी पण तसाच. पंचवीस हजारांचा ऐवज! बाबा, हा संभाळलास कसा ? आणि इतकें करून, एवढा पराक्रम गाजवून स्वतः एक पै खिशांत न टाकतां सारी धन ह्या रंगराव शंकर भोळ्याची केलीस! वसंतराव, तुझ्या तोंडाला पानें पुसायाचें फार वाईट वाटतें, पण काय करूं ? पंचवीस हजार म्हणजे ह्या भिकार होऊन गेलेल्या हिंदुस्थानांत फार वाटतात. विलायतेंत ह्याची किंमत पंचवीस शेंकड्यांइतकीच आहे. तशांत आपण जाऊन बॅरिस्टर होऊन येणार. छे बाबा! वसंतराया, तुला पसंत पडो वा न पडो, तुला पण ह्या अजागळ शाह्ण्याच्याच पंथाला लाविलें पाहिजे! (दूर पाहून ) हा कोण येतो

आहे बरं ! हा बाळासाहेबांचा गडी पिल्या दिसतो. हा कां बरं इतक्या लगबगीनें इकडे येत आहे ? ( पिल्या येऊन दाखल होतो.) रामराम पिलोबा ! कसें काय ?

**पिल्या**:—कसं आन् काय ! बोडकें तुमचें आन् माझं बी.

**रंग०**:—अरे पण झालं काय ?

**पिल्या**:—झालया काय आणि गेल्या काय ? समदं झालंया बगा.

**रंग०**:—अरे पण नीट सांगितलेंस तर ?

**पिल्या**:—नीटच झालया बवा समदं.

**रंग०**:—सांगतोस कां देऊं आतां चांगली एक ?

**पिल्या०**:—द्या बाबा. आम्हां चाकरमाणसासनी काय? आमचें थ्वाबाड सदा पुढेंच आहे.

**रंग०**:—त्या थोबाडांतून निघूं द्या एकदां काय असेल तें खरें !

**पिल्या**:—धनीसाब ईस हजारांची कां पांच आगळ इस हजारांची चोरी करूनशान नाटकांत निगूनशान गेल्ये म्हंगत्यात ?

**रंग०**:—काय म्हणतोस काय ?

**पिल्या**:—लई मिस्किन दिसता राव ! च्वोर तर तुम्हीच अन् जगूं काय ?

**रंग०**:—चूप रहा. गाढवा ! चल नीघ येथून. तुझा धनी चोर निघाला म्हणून का सारेच चोर झाले कां ? मूर्ख कुठला ?

**पिल्या**:—अस्स अस्स ! लय ब्येस ! आतां कुठं जातोस त्यो मीच पाहूनशान घेतो बघ.

**रंग०**:—( आपल्याशीं ) हा असा एकेरीवर उगाच यायचा नाहीं; ह्याला कांहीं तरी समजलें आहे. इतकेंच नाहीं, हा अस्मादिकांशीं दोन हात करायला तयार दिसतो. येथें जरा युक्तीनें वागलें पाहिजे. ( उघड ) पिलोबा.

**पिल्या**:—हां, असे जरासे वाटेवर या.



पिल्याः--" चोरा, भामट्या, चल हो पुढें ! " [ पृ. १९

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत



रंग०:—वाटेवर काय यायचं ? आम्ही नेहमीं वाटेवरच आहों. आडरानांत जाणारे तुम्हीच दिसतां. तुम्ही उघड उघड बोलाल तर सारें नीट जुळेल.

पिल्या:—आधीं दोन हजार रुपये मोजूनशान पदरांत टाका, मग समदं.

रंग०:—दोन हजार पैसे तरी आहेत का मजजवळ ? जा ! व्हा चालते, करा पाहिजे तें, जें नशिबीं असेल तें होईल.

पिल्या:—ब्येस हय ! अमासनी काय. ह्यो चाललों बगा पुढच्या कामगिरीला ( जाऊं लागतो ).

रंग०:—( त्याला धरून ) असें करूं नको. नीट सांग आधीं काय म्हणतोस तें; हे घे चिरिमिरीला पांच रुपये.

पिल्या:—( एकदम गचांडी देऊन ) चोरा, भामट्या, चल हो पुढें ! मी एकला बस हाय तुला खेचूनशान कचेरींत न्यायला. चल टाक दोन हजार रुपये. नाहीं तर चल.

रंग०:—देतों बाबा. मला सोड आधीं.

पिल्या:—जा आण लौकर. ( रंगराव आंत जातो, व पिल्या बाहेर वाट पहात बसतो. )

रंग०:—( रुपये आणून पिल्याला देतो ! ) घे हे पण आतां.

पिल्या:—( हसून ) मोजून दे.

रंग०:—असे उघड्यावर ? जा आंत आणि मोजून पहा हवे तर.

पिल्या:—( घरांत जातो. )

रंग०:—ह्या अक्षरशून्य, गांवढळ मनुष्यानें आज ह्या रंगरावालासुद्धां पाणी पाजलं आं ! केवढा चमत्कार हा ! मी ह्या अशक्त बेंगरूळ माणसाच्या गचांड्या खाव्या ? पण असेंच आहे:—प्रत्यक्ष भीमसेन जरी असला तरी त्याचें अंतःकरण पातकानें व्याप्त असलें,

चिंतेनें जळत असलें, भयानें व्याकुळ असलें, तर तो एखाद्या मेंढरासारखा दीनदुर्बळ होऊन जातो ! असो. ह्या आयुष्यांत माझ्यासारख्या दीर्घोद्योगी पुरुषाला अशा कितीतरी गचांड्या खायच्या आहेत. पण आतां ह्या पिल्याचें काय करायचं ? [ विचार करून ] बस्स, ह्याला आपल्या पदरीं ठेवावा म्हणजे झालं. असला मनुष्य अवश्य आपल्यासारख्याच्या संग्रहीं पाहिजे. ( पिल्या येतो. त्याला) पिलोबा, तुमचे मालक तर गेलेच; आतां पुढें ?

**पिल्याः**—जिकडे मालक तिकडे पिल्या !

**रंग०ः**—आणि त्यांनीं न ठेवलें कामावर तर ?

**पिल्याः**—तरी त्यासनीं सोडायचं नाय !

**रंग०ः**—असं करूं नको. आतां तूं माझ्याजवळ रहा. पगार रुपये पांच दुणे दहा. कसें काय बोल.

**पिल्याः**—( मोठ्यानें हसत सुटतो. )

**रंग०ः**—( आश्चर्यानें त्याच्याकडे पाहून ) अरे, तुला हसायला काय झालं ?

**पिल्याः**—( रागानें पाहून ) गप्प रहा. तुम्हासनी अक्कल अक्सी नाहींच बघा ! काय ? ह्यो पिलोबा वाघमाऱ्या निमकहराम होऊनशान आपल्या मालकाच्या दुस्मानाचा चाकर व्हईल ? थूः असल्या माणसाच्या जिनगानीवर. ह्यो दोन हजार रुपये ह्यो पिल्या उराशीं बाळगून ठेवणार बघा. अन जवा तुम्हां चोरापायीं बाळासाब भीक मागायाला लागतील तवा त्यासनी त्या पैशावर पोसणार. थूः तुझ्या त्वंडावर चोरा. जर धनीसाप ऐकत्ये तर आत्तांच तुला तुरुंगांत घातलें असतें. उचल्या—भामट्या—! ( रागानें जातो. )

**रंग०ः**—जगांत ज्याला लाज म्हणतात ती कशी असते, हें जर मला समजत असतें किंवा समजून मीं त्याची पर्वा केली असती तर ह्या मनुष्याची स्वामिभक्ति पाहून, पाहून कसली अनुभवून मी आज

एकदम विरक्त झालों असतों. पण तें कसचें होतें ? कनक आणि कांता यांचा मोह सुटेल तेव्हां ना ? चला, आतां स्वदेशाला मुकलें पाहिजे ! आतां ब्यारिस्टर होऊनच परत यायचं. ( जातो. )

---

## प्रवेश दुसरा.

( श्रीकृष्णराव आपल्या घरीं बसला आहे. )

**श्रीकृष्ण०**:—( उसासा टाकून ) " कर्मणो गहना गतिः " काय जे आहेत्ते हें दैव आहे पहा. "एकं मित्रं भूपतिर्वा यतिर्वा" मित्र असला तर एक राजा तरी असावा नाहीं तर एखादा संन्यासी तरी असावा, हें शास्त्रवाक्य म्हणून ह्या गर्भश्रीमंत बाळासाहेबाचा स्नेह संपादन केला जे आहेत्ते. तर त्याचा जे आहेत्ते हा दुर्घट परिणाम ! आतां भूपति सोडून यतीचा स्नेह जे आहेत्ते संपादन करायची जे आहेत्ते पाळी आली. यती तरी कुठला आणायचा ? आतां आपणच यती व्हावें झालें. त्याशिवाय हें पोलिसचें लिगाड टळणें नाहींच जे आहेत्ते ! अर्थात् पुढें " एको वासः पत्तने वा वने वा " राहावयाचें तर शहरांत रहावें, नाहीं तर जंगलांत रहावें. आलेंच कपाळीं जंगलांत रहाणें आतां. ( इतक्यांत एक पोलीस दारावरून जातो व आंत डोकावून पहातो. ) अरे, पुन्हा आला तो यमदूत ! नको, नको, नको. आजपासून त्या रंगरावासारख्या गाढवाच्या थाऱ्याला उभें रहावयाचें नाहीं. आग लागो त्या पैशाला आणि त्याच्याकरितां कराव्या लागणाऱ्या ह्या असल्या लटपटींना. ( पुन्हा पोलीस दारावरून जातो ) अरे, हें भूत पक्केंच मागें लागलें! आतां ही चौघडी पांघरून जे आहेत्ते आजीबाईसारखा खोकत बसतो. ( त्याप्रमाणें करतो; कांहीं वेळानें वसंतराव प्रवेश करतो. )

**वसंत०**:—कोण आहे घरांत ? आजीबाई, श्रीकृष्णशास्त्री आहेत का ?

**श्रीकृष्ण०**:—आतांच बाहेर गेले जे आहेत्ते.

**वसंत०**:—आजीबाई, तुमच्या पण तोंडीं जे आहेत्ते बसलें आहे का ? तुमचा आवाज पण नातवासारखाच आहे. पाहूं तुम्हांला नातवासारखें मिसूर फुटलें आहे का ? (श्रीकृष्णरावाच्या अंगावरची चौघडी काढतो; तो काढूं देत नाहीं.)

**श्रीकृष्ण०**:—वसंतराव, अरे नको. तो यमदूत आतां येईल, सोड मला. निदान माझ्या अंगावरची ही चौघडी तरी काढूं नको.

**वसंत०**:—कोणता यमदूत ! जे आहेत्ते.

**श्रीकृष्ण०**:—अरे, हळू तरी बोल. बाबा, आपल्या सगळ्यांच्या पाळतीवर पोलीस आहेत पोलीस.

**वसंत०**:—आणि ते काय म्हणून ?

**श्रीकृष्ण०**:—काय म्हणून तें विचारा आतां आपल्या कर्माला. "हांसत कर्म करावें भोगावें रडत तेंच परिणामीं". काढा आतां स्त्रीसंगितनाटककंपनी तुरुंगांत जाऊन.

**वसंत०**:—चल, असा वेड्यासारखा बरळूं नको. पोलीस आपलें काय करणार ? अण्णासाहेबाला त्यांच्याच चिरंजीवांनीं लुटलें, त्यांनींच सारा चोरीचा ऐवज नेऊन विकला. त्यांतील एक कपर्दिक तुझ्याजवळ किंवा माझ्याजवळ नाहीं. मी मात्र भाड्याच्या बैला-प्रमाणें हवा तेवढा राबलों. आणि माझ्या मनांत नव्हतें, पण बाळा-साहेबांच्या आग्रहामुळें तो सारा पैसा रंगरावाच्या स्वाधीन केला. ह्यांत मुख्य गुन्हेगार कोण ? अर्थात् बाळासाहेब. तो पक्का असल्यावर तुमचें आमचें कोण काय करणार ? बाकी रंगरावाचें मात्र निदान मला भय वाटतें. तो काय करील तें करो. बहुतकरून तो सर्वां-च्याच हातावर तुरी देईलसें वाटतें; पाहूं आतां काय होतें तें ! रंगरावाला वाटत असेल, कीं मी मोठा शहाणा आहे, पण माझ्याशीं गांठ आहे म्हणावें !

**श्रीकृष्ण०:**—मग, तुम्ही सारे तिकडे जे आहेत्ते काय हवें तें करा. मला तुमचीं तोंडें पहावयाचीं नाहींत. ते यमदूत आले तर मी त्यांना तुमच्याकडेच लावून देतों जे आहेत्ते.

**वसंत०:**—बरं आहे आजीबाई, येतों तर आतां. ( जातो ).

**श्रीकृष्ण०:**—चला, तें भूत आलें कीं नाहीं तोंच येथून पोबारा करावा.

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**—अपोलो बंदर.

( युरोपियन पोषाख केलेला रंगराव येतो. )

**रंग०:**—माझें नांव मि. ए. बी. फॉक्स ! रंगराव शंकर भोळे पैसे घेऊन नाटकाचे पडदे वगैरे सामान आणायला विलायेतेंत गेला तो तिकडेच मेला ! आणि त्याच घटकेस हा मि. फॉक्स आकाशांतून खालीं उतरला. आतां हवीं तेवढीं वारंटें जाऊं द्या विलायतेंत रंगरावाच्या मागें. मि. मुळींच आस्ट्रेलियांत जाणार; तेथें इंग्रेजीचें ज्ञान चांगलें संपादन करणार, मग हें वावटळ अगदीं शांत झालें म्हणजे मि. फॉक्स मरणार आणि रंगराव पुन्हां जन्मास येऊन इंग्लंडांत कायद्याचा अभ्यास करणार. वावटळ तसेंच राहिलें तर मि. फॉक्स तसेच रहाणार. असो, आतां हे माझ्या जन्मभूमि, मी किती जरी लबाड्या केल्या, किती जरी वाईट असलों, तुझ्या अगदीं उपयोगीं न पडलों तरी मी तुला कधीं विसरणार नाहीं.

**“ प्रियकर हिंदुस्थान आमुचा प्रियकर हिंदुस्थान ”**
**खरोखर खरोखर “ प्रियकर हिंदुस्थान**
**आमुचा प्रियकर हिंदुस्थान. ”**

रिठ्ठळणा१।१।

हे प्रिय जन्मभूमि, मी तुझा खरोखर कुपुत्र आहे. तरी पण

**" कुपुत्रो जायेत कचिदपि कुमाता न भवति ! "**

आई जन्मभूमि, तुझा विरह मला सहन होत नाहीं. पण काय करूं ? मला गेलेंच पाहिजे. कधींतरी तूंच मला शुद्धीवर आण. तूंच मला सुमार्गाला लाव. तुझ्याकडे पाहिलें, तुझी आठवण झाली म्हणजे मला पूर्ण पश्चात्ताप होतो ! पण माझा इलाज नाहीं. डोंगरावरून घसरलेला मनुष्य खालींच जाणार, त्याला मध्यें थांबतां येत नाहीं. तो एकदां जेथें जाऊन पडावयाचा असेल तेथें पडला म्हणजे मग हवा तर पुन्हां डोंगर चढूं लागेल. नसेल तर दुसऱ्या कोणींतरी त्याला डोलींत घालून वर नेलें पाहिजे. तसेंच माझें झालें आहे. तरी मी निरंतर माते जन्मभूमि, हाच मंत्र म्हणणार.—

**" प्यारे हिंदुस्थान तूं मेरा जीवप्राण. "**

( जातो. )

---

नगर वाचनालय सातारा
दा. नं. ६६६३
ता. ०१।५५९
८.५४

## अंक ३ रा.

चारुदत्तः--गुरुजी, आपणच आतां आमच्या दोघांच्या वादाचा निवाडा करा.

गुरुजीः--काय वादाचा निवाडा? तुम्ही दोघे भाऊ भांडलां? तर मग आधीं तुम्हींच माझें तुम्हांविषयीं या क्षणापर्यंत जें मत होतें त्याचा निवाडा केलांत!

पद.

ही वस्तू ही तिची सावली हें तुमचें नातें।
बंधुपणा हा सदा रंजवी माझ्या चित्तातें ॥ ध्रु० ॥
परी आज तो विलया गेला ऐकुन हें मातें।
किती खेद हो! वर्णाया तो शक्ति न जिव्हेतें ॥ १ ॥

काय खरेंच का तुमचें भांडण झालें?

देवदत्तः--( किंचित् हंसून ) नाहीं गुरुजी, आम्ही भांडलों नाहीं आणि भांडावयाचें नाहीं. एका गोष्टीसंबधानें आमचीं भिन्न मतें पडलीं आहेत इतकेंच. भाऊ म्हणतो, जगांत दारिद्र्यासारखी हितकारक स्थिति दुसरी नाहीं!

चारुदत्तः--होय, नाहींच तशी हितकारक दुसरी स्थिति! तुम्हीच पहा गुरुजी--

जग हें व्यर्थ निंदी त्याला।
दारिद्र्याला सर्व गुणांच्या उदार जनकाला ॥
विचारा जाऊन संतांला।
परमार्थाचा बोध कुणींहो तुम्हांस पटवीला।

बघा ही विद्वज्जनमाला ।
दारिद्र्यानें हींत ओंविल्या अनर्घ्य रत्नांला ।
विचारा जाऊन शूराला ।
दारिद्र्याची अतुल्य महती विजयी वीराला ॥

देवदत्त:—भाऊचें म्हणणें खोटें आहे असें मी म्हणत नाहीं. माझें म्हणणें इतकेंच आहे, कीं दारिद्र्याचा असा चांगला उपयोग फारच थोडे लोक करून घेतात. नाहीं का गुरुजी ? जगांत चोरी, खून, फसवेगिरी, मनुष्यासारख्या मनुष्यानें सारी लाज गुंडाळून ठेवून कुत्र्याप्रमाणें श्रीमंतांपुढें शेंपूट हालवणें, नंदीबैलाप्रमाणें त्यांच्या होस हो करून मान डोलावणें, पोटासाठीं स्वदेशाचा, स्वकुलाचा अभिमान सोडून एखाद्या निंद्य कर्माला प्रवृत्त होणें, ह्या सर्व दुर्गुणांचें मायपोट दारिद्र्यच नाहीं का ?

चारुदत्तः—नाहीं. ह्या दुर्गुणांचें मायपोट लोभ, असंतोष, अज्ञान.

देवदत्त:—पण लोभ, असंतोष, अज्ञान यांचें मायपोट कोणतें दारिद्र्यच ना पुन्हा ?

चारु०:—तुम्ही दोघेही थोडेसें चुकलां आहां; तुम्हांला माहीत नाहीं, पण मी सांगतों,—तुमचा बाप सुमित्रराव, अण्णासाहेब म्हणजे बाळासाहेब उडव्याचा बाप आणि मी—आम्ही तिघे सहाध्यायी होतों. तिघांनीं मधुकरी मागून, वार लावून विद्या संपादन केली. पैकीं मला आणि तुमच्या बापाला त्या दारिद्र्यावस्थेमुळें काय शारीरिक त्रास होत असे तेवढाच. आम्हांला कधीं कोणाचा मत्सर वाटला नाहीं. किंवा कामापेक्षां अधिक प्राप्ति व्हावी असें वाटलें नाहीं. मला वाटतें आमचे स्वभावच असे होते कीं, आमच्या त्या गरीबीमुळें आमच्या अंगीं दीर्घोद्योगीपणा, संतोष व जगांतल्या सुखोपभोगाकडे पहाण्याची आवड हे गुण उत्पन्न व्हावे. आजपावेतों आमची हीच संपत्ति आहे. आणि ही तुम्हां मुलांना तुमच्या बापा-

कडून आणि थोडीबहुत मी तुमचा शिक्षक म्हणून मजकडून प्राप्त झाली आहे. पण अण्णासाहेबाचा स्वभाव अगदीं निराळा होता, त्याचें लक्ष या जगांतल्या मोठेपणापलीकडे कधीं गेलेंच नाहीं, आणि सारा मोठेपणा, सारें सुख, सारें जन्माचें सार्थक श्रीमंतींत आहे असेंही त्याला वाटूं लागलें. त्याप्रमाणें कामापुरता अभ्यास झाल्याबरोबर शाळा सोडून तो पैशाच्या मागें लागला. त्यानें काय काय केलें आणि एवढा पैसा कसा मिळविला हें तुम्हांला ऐकून काय करावयाचें आहे? इतकें खरें, कीं त्याला दारिद्र्यानें अधाशी, आणि अधाशीपणाबरोबर दुसऱ्या कित्येक दुर्गुणांनीं भ्रष्ट केलें. आम्हां दोघांना त्याच दारिद्र्यानें निराळा मार्ग दाखविला. तो पहिला दरिद्री आणि आतां कृपणांतला कृपण म्हणजे संपत्तिमान दरिद्री झाला आहे! आम्ही कामापुरते पैसे मिळवून पुढें तुम्हीच म्हणा काय म्हणायचें असेल तें.

**चारुदत्तः**—सदा संतुष्ट, सदा संपन्न, सदा सुखी झालां आहांत!

**देवदत्तः**—आणि तुमच्या आशीर्वादानें आम्ही!

**गुरुजीः**—सारांश आला का तुमच्या लक्षांत? मनुष्य आपल्या परिस्थितीचा स्वामी आहे. सधनतेचा किंवा निर्धनतेचा उपयोग किंवा दुरुपयोग करणारा मनुष्य आहे. संपत्तीच्या योगानें मनुष्याचें अकल्याणच होतें असें नाहीं. तसेंच विपत्तीच्या योगें त्याचें अकल्याणच होतें असेंही नाहीं.

**चारुदत्तः**—मला वाटतें.

ज्ञान हेंच वित्त खरें सर्व सौख्यदायी ।
शील हीच शक्ति खरी भंग जिला नाहीं ।
ज्याला हीं लब्ध दोन धन्य तोच लोकीं ।
स्वर्ग धरा एक त्यास जाहली विलोकीं ॥१॥

**गुरुजी**:—होय चारुदत्ता, खरोखर तूं म्हणतोस असंच आहे. तरी ज्ञानापेक्षांही शील फार मोठें आहे; जर शील चांगलें नसेल तर ज्ञानाचासुद्धां दुरुपयोग होण्यासारखा आहे. " विद्या विवादाय धनं मदाय " कुशील मनुष्याला विद्या जरी प्राप्त झाली तरी तिच्या योगानें तो जगांत विवाद मात्र वाढवील. ज्याचें शील चांगलें नाहीं त्याला पैसा मिळाला तर तो मदोन्मत्त होईल. "द्वारीं मूत्रेंहि जेविं जंबाळ " ह्या मोरोपंतांच्या उक्तीप्रमाणें अल्पज्ञानानें बृहस्पति बनलेले आणि अल्प धनानें राजेमहाराजे बनलेले हलकट लोक थोडे का आहेत? आणि ह्यांच्यापासून जगाला थोडा का त्रास होत आहे? बाबांनो, एक शील चांगलें असलें म्हणजे सारें चांगलें आहे, नाहीं-तर सारें वाईट आहे.

**चारु०**:— } समजलें गुरुजी, ह्या उपदेशाबद्दल आम्ही आपले
**देव०**:— } ऋणी होतों.

**गुरु०**:—आतां तुमचा वाद मिटला ना?

**चारु०**:—होय, मिटला; पण आमचें भांडण नव्हतें, नुसतें मतांतर होतें.

**गुरु०**:—बाळांनो, तुमची ही अक्कल आमच्या देशांतल्या पुष्कळ पुढाऱ्यांना नाहीं. नुसत्या मतांवरून हे एकसारखे भांडत रहातात.

**देव**:—आम्ही मोठे झालों म्हणजे त्यांचा समेट करूं.

**गुरु**:०—शाबास, ईश्वर तुम्हांला आशीर्वाद देवो.

**चारु०**:—गुरुजी, आपणांला आणि बाबांना मी एक विनंति करणार आहे, आपली परवानगी असेल तर.

**गुरु०**:—कोणती ती?

**चारु०**:—लहानातोंडीं मोठा घांस घेण्याबद्दल मला क्षमा असावी. पण अण्णासाहेब आपले आणि बाबांचे बाळमित्र असून आपण दोघे

त्यांचा आणि त्यांच्या मुलाचा समेट करून देण्याचे कांहींच यत्न कसे करीत नाहीं ह्याचें मला नवल वाटतें.

चालः—" कधिं करिती लग्न—"

**विझवावा दयामेघें कलहाग्नी पेटला ॥ ध्रु० ॥**
**अरि गमे बाप पुत्रास, पुत्र बापास ।**
**नरक हा खास, गृहाचा झाला,**
**कलहाग्नी पेटला ॥ १ ॥**
**" गृह नव्हे समरभूमि ती "**
**भले सांगती**
**ऐकुनी किती**
**जीव हो भ्याला । कलहाग्नी पेटला ॥ २ ॥**

ह्या बापलेकांची समजूत घालण्याचें सामर्थ्य आपणां दोघांवांचून कोणाला आहेसें मला वाटत नाहीं.

**गुरु०**:—( हंसून ) चारुदत्ता,

**अज्ञः सुखमाराध्यः सुखतरमाराध्यते विशेषज्ञः ।**
**ज्ञानलवदुर्विदग्धं ब्रह्मापि तं नरं न रंजयति ॥**

हा भर्तृहरीचा श्लोक तुला ठाऊक आहे ना ? सांग पाहूं तर त्याचा अर्थ.

**देव०**:—मी सांगतों.

**गुरु**:—बरं तूं सांग.

**देव०**:—

श्लोक

**ज्यांला ज्ञान नसे तयां सहज ये वाटेवरी आणतां ।**
**सोपें त्याहुनियां प्रसन्न करणें ज्ञानी जनां सर्वथा ॥**
**ज्ञानाचा लवमात्र पावुन मनें ज्यांचीं पुरीं नासलीं ॥**
**ऐशा अर्धवटांशिं गांठ पडतां नाहीं विधीची भली ॥ १ ॥**

नगर वाचनालय, सातारा.

**गुरु०**:—शाबास! तर मग प्रथमतः अण्णासाहेबांची आणि त्यांच्या त्या बाळासाहेबांची स्थिति थेट अशीच आहे. शिवाय ते पडले श्रीमंत!

**चारु०**:—होय. आणि म्हणून त्यांना वाटत असेल:—

"चालः—स्वार्थी जी प्रीति मनुजाची—"

**श्रीमंती सर्व सुगुणांची वाहिनी ॥ ध्रु० ॥**
**श्रीमंताहुनी बृहस्पतींची बुद्धी फार उणी ॥ १ ॥**
**ज्ञाता, वक्ता, कवी, रसिक, मुनि वीर, समस्त धनी!॥२॥**
**क्षुद्र जीव हे मानव सारे श्रीमंतास जनीं ॥ ३ ॥**

तरी गुरुजी गर्वाधावरही आपलें वजन पडण्यासारखें आहे.

**गुरु०**:—होय, असेल; पण त्यांतल्या एकाचें डोकें फिरलें आहे. तसं झालं तरी नवल नाहीं; कारण, बाळासाहेबांनीं तसेच गुण उधळले आहेत. नाटककंपनी काढावयाची म्हणून पंचवीस तीस हजार रुपयांचा ऐवज त्या रंगरावाच्या आयताच पदरांत टाकला. बरं, तितकं करून तरी थांबायचं होतें? पण तसें कसें होईल? अज्ञान, कुसंगति, बापानें घालून दिलेले अनेक नीचपणाचे कित्ते ह्यांचा परिणाम इतकाच होऊन राहिला नाहीं. त्या रंगरावावर बापानें फिर्याद केली तर लेकानें त्याचा पक्ष उचलून सरकारदरबारांत बापाची फजिती केली. अण्णासाहेब जसा कृपण तसाच तामसी स्वभावाचा आहे. अर्थात् ह्यापुढें बापलेकांचें मुळींच पटेना. अशा स्थितींत चिरंजीव पुन्हा चोरी करून नाटककंपनी काढून घरांतून निघून गेले, आणि प्रत्यक्ष आपल्या गांवांत येऊन तोंडाला रंग फांसून नाचायला लागले. अर्थात् म्हाताऱ्याला हें सहन कसें होणार? त्याचें माथें फिरलें तर नवल नाहीं. तशांत बायकोनेंही केवळ पुत्रशोकानें परलोकची वाट धरली. कोण ही दुर्दशा! अज्ञान, कृपण, नीच मनाच्या मनुष्याची संपत्ति हा असा त्याचा आणि त्याच्या कुलाचा

शीलं परं भूषणं - ना. ना. टिळक. ५६६/६५६३

नाश करते. तरी आम्ही ह्या बापलेकांला शेवटपावेतों साह्य करूं. यश देणारा परमेश्वर आहे.

चारु०:—गुरुजी, मला निरंतर एकच वांछा आहे.

चाल—" अर्पिलें सुमन तें "

**भय असो मनाला संतत जगदीशाचें ।**
**प्रेम सदा सुजनाचें ।**
**व्यसन असो सुविद्येचें ।**
**पंथीं रहावें रमावें सुनीतीचे ॥**

**गुरु०**:—अशी ज्याची वांछा आहे तोच खरा सुखी. बाळांनो, तुमचा शिक्षक होऊन मी धन्य झालों, आणि माझ्यापेक्षां धन्य तो महात्मा तुमचा पिता. ( जरा थांबून ) अरे, हा गलबला कसला ऐकूं येतो ! चला, चला गच्चीवर जाऊन काय आहे तें पाहूं.

**दोघे**:—चलावें गुरुजी. ( पुढें गुरुजी, मागें दोघे भाऊ हातांत हात घालून जातात. )

गांवचा रस्ता.

( अण्णासाहेब उलटें पागोटें घालून वेड्यासारखे येतात. )

**अण्णासाहेबः**—

**चालः**—" भूपती खरे ते—"

**आकाश पहा हें माझ्या पायांखालीं ।**
**ही धरणी माझ्या डोईवरती गेली ! ॥ध्रु०॥**

( हंसतो ) सातशें अठ्याहत्तर रुपये, अकरा आणे, एक पै. ( पुन्हा हंसतो ) हीं पहा फुलें माझ्या डोईवर पडत आहेत ! फुलें कसलीं !

**ही धरणी जळते धगधग जळतें सारें !**
**हे डोक्यावरती कोसळतात निखारे !**

( उडी मारून पोळल्याप्रमाणें हावभाव करून )
अरे पाणी आणा पाणी.
( धावत सुटतो. बाजारबुणगे वेडा वेडा म्हणून मागें लागतात. )

**अण्णा०**:—काय रे ए चोरांनो, तुम्हांला माझी दौलत पाहिजे होय? ( हंसतो ) जा, लुटा जा सारी, एक कपर्दिक ठेवूं नका. हा पैसा म्हणजे हालाहलविषापेक्षां भयंकर आहे. पाणी आणा पाहूं. माझ्या हातावर या विषाचीं किती पुटें बसलीं आहेत, मला तीं धुऊन टाकलीं पाहिजेत. हे पहा माझे हात. ( हंसतो ) घ्या हे सारे पैसे. घ्या, तुम्हीच हे घेऊन मरा जा. ( खिशांतून कांहीं रुपये, चवल्या, पावल्या, पैसे काढून फेकून देतो. त्याबरोबर लोक ते वेंचूं लागतात. )

**अण्णा०**:—(लोकांवर तुटून पडतो ) अरे चोरांनो, आणा ते पैसे इकडे! पैसे झाडाला लागत असतात नाहीं का? चोर हरामखोर कुठले. ( हातीं लागेल त्याला बडवीत सुटतो. कोणापासून पैसे हिसकावून घेतो. पुष्कळ लोक पळून जातात. )

**एक भटजी**:—(अण्णासाहेब त्याला धरून त्याच्या खिशांतून पैसे काढीत असतां ) अरे, पण बाबा मी ह्या गर्दींत मुळींच नव्हतों, मी आतांच श्राद्धाचा जेवून दक्षिणेचा रुपया घेऊन घरीं चाललों आहे. हा रुपया तुझा नाहीं.

**अण्णा०**:—अय्यो, तूं चोर आहेस. माझ्या काटर्याच्या कंपनींतला श्रीकृष्णशास्त्री तोच तूं. ( त्याला खूप चोपीत सुटतो. )

**भटजी**:—अरे, धावा धावा, मेलों मेलों. ( इतक्यांत सुमित्रराव व गुरुजी येऊन अण्णासाहेबाला धरतात. )

**सुमित्र०**:—अण्णा, चूप.

( अण्णा त्याच्या तोंडाकडे पाहून भटाला सोडून मोठ्यानें गळा काढतो. सुमित्र व गुरुजी अण्णासाहेबाला आवरून धरतात. )

**गुरु०**:—( लोकांना ) वेडयाच्या नादीं लागण्यांत कोणता अर्थ आहे? बाबांनो, तुम्ही आपल्या वाटेनें जा.

**भटजी**:—पण माझा रुपया?

**गुरु०**:—हा घ्या; गडबड करूं नका, जा.

**सुमित्र०**:—अण्णा, घरीं चल पाहूं. रडं आटप.

**अण्णा०**:—घरीं ( हंसून ) कोणाच्या?

**सुमित्र०**:—माझ्या चल, आटप लौकर.

**अण्णा०**:—

**चाल**—" लक्ष्मण पडतां धरणीला—"

**" आटपलें रे आटपलें ! बाबा, अवघें आटपलें "**


( गळा काढतो )

**गुरु०**:—याच्याशीं बोलत बसण्यांत अर्थ नाहीं. ह्याला बळेंच ओढीत नेला पाहिजे.

**अण्णा०**:—कां रे बाबांनो, मी कां वेडा आहे? का दारू प्यालों आहे? का मी चोर आहे? पण काय रे सुमित्रा, हे कोण? गुरुजी नाहीं का? वा! तुम्ही दोघे भेटलां, किती चांगलें झालें! सुमित्रा, कर पाहूं पुन्हा एकदां आपण लहान होतों तेव्हांचा तो उपदेश. हूं चालूं दे! काय म्हणतोस? अण्णा, शीलासारखें जगांत कांहीं नाहीं! माझ्या पोराचें तेवढें शील चांगलें असतें, तर हाच पैसा त्याच्या किती उपयोगीं पडला असता! खरंच आधीं शील, आधीं ज्ञान, मग पैसा. नको मला तो पैसा दृष्टीसमोर नको. घ्या, सारें घ्या. सुमित्रा, हें पागोटें घे, हें देऊन टाक कोणाला. गुरुजी, हा अंगरखा, सारें सारें घ्या. सुमित्रा, झालों मी संन्यासी. आतां मी जिवंतपणींच जलसमाधि घेतों!—सोडा मला. ( हिसका-हिसक करतो ).

**सुमित्र०**:—अण्णा, अण्णा, अंमळ थांब. तुला संन्यास घ्यायचा

[library stamp]



बाळा०:--कुठें आहे तो वेडा ? नाईक, चला, तो पहा पळत चालला आहे तिकडे. [प्र. ३५.

ना? तो तर घे आधीं. चल घरीं मी त्याची तयारी करतों. संन्यास घे, मग पुढें जलसमाधि.

**अण्णा०:**—( हंसून ) म्हणजे त्या मूर्ख काटर्यानें आणखी चोरांची धन करावी आणि माझ्या साऱ्या घरादारावर खराटा फिरवावा! पैसा मिळवायाला किती श्रम करावे लागतात याचा तर्क तुम्हांला कोठून होणार? भिकारडे तुम्ही! चला, निघा येथून. हा अण्णा असातसा नाहीं; साऱ्या चोरांची हड्डी हड्डी मोकळी करून हा अण्णा गेलेलें धन परत आणील तेव्हां राहील.

**गुरु०:**—बरं, तसं कर. पण घरीं चल आधीं.

**अण्णा०:**—त्सं काय कर? ( वेडावून ) त-सं-क-र ! डोचकं तुझं! मला करायचं काय आतां त्या काटर्याशीं आणि त्या धनदौलतीशीं? माझ्या संन्यासाची तयारी करा. ( डोळे वटारून, थरथर कापून ) पण काय रे! हे कोण येत आहेत हे अकराळ विकराळ राक्षस इकडे! अरे, हा रामजी जाधव ! हा महादबा पाटील ! हा बाबूराव! हीं सुंदराबाई! हीं सारीं माणसें मेलीं होतींना? माझ्या लोभानें, निर्दयपणानें, विष खाऊन, अन्नान्न करून, रडरडून हीं निजधामास गेलीं होतींना? अरे, जाधव, मी पायां पडतों. मला असा डसूं नको. ( कोणी तरी मारल्याप्रमाणें घायतळ येऊन पडतो.) मेलों मेलों, धावा धावा! ( मूर्च्छित पडतो. )

**सुमित्र०:**—फारच बेताल झाली आहे याची प्रकृति.

**गुरु०:**—आतां ह्याला असाच उचलून घरीं नेला पाहिजे. पण न्यावा कसा? जवळपास तांगाही नाहीं.

**सुमित्र०:**—त्याच्यांत राहिलें आहे काय? हा मीं उचलला पहा त्याला.

**गुरु०:**—नको नको, मीच नेतों. (त्याला उचलूं लागतो. इतक्यांत)

**अण्णा०:**—अरे जाधव, ए महादबा, अरे सोडा मला! मी तुमचे

सगळे रुपये देतों. चला माझ्या घरीं. सोड मला. काय नाहीं सोडीत तुम्ही ! (धिंगामस्ती करून सुटून पळून जातो. इतक्यांत बाळासाहेब एक पोलीसचा शिपायी व चारपांच दुसरीं माणसें घेऊन येतो.)

बाळा०:--कुठें आहे तो वेडा ? नाईक, चला, तो पहा पळत चालला आहे तिकडे.

सुमित्र०:—बाळासाहेब !

बाळा०:—मला वेळ नाहीं बोलायला. त्या वेडयाला आधीं नेऊन पागलखान्यांत कोंडून टाकलें पाहिजे. (पोलीस वगैरे सर्व अण्णासोहबांच्या मागें लागतात. )

सुमित्र०:—गुरुजी, केवढा अधमपणा हा ह्या पोराचा.

चालः—" नाहिं सुभद्रा—"

**कृतघ्न निर्दय राक्षस झाला**
**मायबाप कसलीं**
**नरक करीती दुष्ट पिशाचें**
**धरणीचा असलीं ॥ ध्रु० ॥**
**विषयवासनाज्वालेमाजीं**
**पूर्णाहुति दिधली ।**
**सकल मतीची सकला नीतिची;**
**राख मात्र उरली ॥ १ ॥**
**मर्कटपुच्छा पेटविलेली**
**चिंधी बांधीली ।**
**कापुरुषाला त्यापरि जाणा**
**संपत्ती दिधली ॥ २ ॥**

गुरु०:—पोराचा अधमपणा तर खराच. पण हा अधमपणा ह्याच्या अंगीं कोणीं आणून दिला, ह्याचा विचार केला म्हणजे फार वाईट वाटतें. एक संपत्ति असली म्हणजे विद्येची, ज्ञानाची गरज

नाहीं हें ह्याच्या बापाचें ठाम मत ! अर्थात् ह्या मताप्रमाणें त्यानें होऊनच आपल्या संपत्तीचा वारस एक मूर्ख शिरोमणि करून ठेविला. शिवाय त्याचे अतोनात लाड केले. त्याच्या योगानें त्याला बाळपणापासूनच आईबापावर अधिकार गाजवायला शिकवून ठेवलें. बापाचें पहिलें कर्तव्य म्हणजे आपल्या मुलाचें उत्तमप्रकारचें शील बनविणें. तें कर्तव्य ह्या पोराचा बाप विसरून बसला.

**सुमित्र०**:—नुसता विसरून बसला नाहीं, त्याला फार निंद्य वर्तनाचे कित्ते घालून दिले. पैशासाठीं आपला बाप कसा जगाला फसवितो, कसा खोटें बोलतो, कसा क्रूरपणा करतो हें त्यानें डोळ्यांनीं पाहिलें आणि त्याला पापाचें कांहीं वाटेनासें झालें. सारांश, ह्या पोराचा नाश त्याच्या बापानेंच केला.

**गुरु०**:—यांत संशय नाहीं. हा पोरगा आतां पुरता भिकेस लागेल, तेव्हां शुद्धीवर आला तर येईल.

**सुमित्र०**:—होय, अजून सुसंगति मिळाली तर. तें असो. पण गुरुजी, आतां पुढें अण्णाचें काय करायचें ? हजारपांचशें रुपये खर्च आला तरी हरकत नाहीं, पण त्याचें डोकें ताळ्यावर आणायाचे योग्य उपाय केले पाहिजेत. मी आपल्या मुलांमाणसांच्या नांवानें हजार रुपये ब्यांकेंत ठेविले आहेत, तीच कायती माझी शिल्लक. तींतून अर्धी मी अण्णाप्रीत्यर्थ खर्च करितों.

**गुरु०**:—लागेल तेव्हां पाहूं. सध्यां हा खर्च मी आपल्या अंगावर घेतों.

**सुमित्र०**:—तो कां पण ?

**गुरु०**:—कां म्हणजे? मला मुलेंमाणसें नाहींत म्हणून. ईश्वराच्या इच्छेप्रमाणें मी एकटा झाल्यापासून ह्या पैशाचें काय करावें ही मला काळजीच होती. बरं झालं, त्याचा असा सत्कार्यीं व्यय होत आहे.

---

# अंक ४ था.

( रंगरावाचा बंगला )

( गच्चीवर एका ईझीचेअरवर पडून वर्तमानपत्र वाचीत आहेत-पत्र खालीं ठेवून. )

**रंग०**:—मनुष्याचं मन किती चमत्कारिक आहे पहा ! खरं पाहिलं असतां मला आतां कोणाचें भय उरलें आहे ? मी ब्यारिस्टर झालों, नांवलौकिकास चढलों, मूठभर माणसांशिवाय साऱ्या जगाची मीं खात्री करून दिली कीं, बाळासाहेब उडव्याच्या पैशाला मी शिवलों नाहीं ! आज प्रसिद्धपणें मला चोर, ठक म्हणण्याची कोणाला छाती होणार नाहीं, तरी मला त्या भिकारड्या गांवढळ पिल्याला पाहिलें म्हणजे जमीन फाटेल तर तिच्या उदरांत तरी जाऊन लपेन असें होतें. खरोखरच हें मोठें नवल नाहीं का ? ज्याच्या संसाराची मीं वाताहात केली, माझ्या पाजीपणामुळें जो आज अन्नाला मोताद झाला आहे, त्या बाळासाहेबापुढेंसुद्धां मी मिशांवर ताव देत एखाद्या सत्यप्रिय, स्वाभिमानी लोकमान्य पुरुषासारखा तासांचे तास बसून राहतों, आणि ह्या पिल्याला पाहिलं कीं माझें तोंड काळं ठिक्कर पडतं ! कां बरं असं ? ( विचार करून ) बरोबर आहे. मी मित्रद्रोही आणि पिल्या स्वामिभक्त ! माझ्या मांडीवर डोकें ठेऊन निजणाराची मान कापणारा मी, आणि पिल्या आपली मान देऊन आपल्या मालकाचें रक्षण करणारा ! मी कपटाचा सिंधु, पिल्या सत्याचा ! मी द्रव्यलोभी ! पिल्या दरिद्री असून दाता ! मी विद्वान्, पिल्या अक्षरशत्रु ! मी ब्यारिस्टर ! पिल्या आतां भिकेस लागलेल्या अशा गर्भश्रीमंताचा हुजऱ्या ! मी नरकाचें साधन करणारा, पिल्याकरतां

स्वर्गाचीं दारें सदा उघडलेलीं ! मी नीच, पिल्या उच्च ! मी प्रत्यक्ष भूत, पिल्या देवदूत ! मग त्याला पाहतांक्षणीं, माझी बोबडी वळली तर त्यांत नवल कसलं मानावयाचें ? (थोडा वेळ विचार करून) पण हे असले नामर्दपणाचे विचार मनांत येऊं देऊन उपयोग काय आतां ? लोक म्हणतात, कॉन्शन्स म्हणजे अर्थात् हें चांगलें, हें वाईट सांगत असणारी बुद्धि ही एक ईश्वरी देणगी आहे; पण माझा अनुभव मला साफ सांगतो, कीं ही बुद्धि म्हणजे मनुष्याच्या अंतःकरणाला डसणारा एक विंचूच आहे. हा विंचू जिवंत ठेवणें हा मूर्खपणा होय. ( मोठ्यानें हंसून ) वाहवा ब्यारिस्टरसाहेब, मग तुम्हीं ब्यारिस्टरी चांगलीच कराल. ( विस्मित होऊन ) हे शब्द त्याच कॉन्शन्सचे ! बाई जिव्हे, तूं हवें तर या कॉन्शन्सचें ऐक आणि हवी तितकी बडबड कर, पण माझ्या लाडक्या कानांनो, तुम्ही ती बडबड मुळींच ऐकूं नका !

( इतक्यांत एक चाकर येतो. )

**चाकर**:—रावसाब, खालीं योक गिरस्त वाट्ळच आल्येती, भ्येटायचं म्हंगतात.

**रंग०**:—त्यांचें नांव काय ? जा हें कार्ड आणि पेन्सील घेऊन आणि तितकं लिहून आण.

**चाकर**:—जी रावसाब.

**रंग०**:—हा पिल्या तर नसेल ना ! छेः त्याला गृहस्थ कोण म्हणतो ? आयत्या बिळांतले नागोबा म्हणजे गृहस्थ; आमच्यासारखे संभावित भामटे म्हणजे गृहस्थ ! विद्या, अधिकार, पैसा ह्यांच्या दडपणाखालीं झांकून ठेवलेलें असंख्य दुर्गुणांचें गांठोडें म्हणजे गृहस्थ ! पिल्या कसचा गृहस्थ ! ( इतक्यांत चाकर येऊन कार्ड देऊन अदबीनें दूर उभा राहतो. )

**रंग०**:—जा, त्यांना सांग उद्यां सकाळीं या.

**चाकरः**—जी रावसाब. ( जातो. )

**रंग०ः**—ही ह्याची सातवी किंवा आठवी खेप असेल ! काय चमत्कार आहे पहा. केवळ दहा वर्षांचे आंत ह्या स्वारीनें कमींत कमी एक लाखाची इस्टेट उडविली. आतां हा बाळासाहेब, रुपया आठ आण्याकरितां असा दारोदार भीक मागत हिंडेल असें कुणाला स्वप्न तरी पडलं असेल का ? ( चाकर पुन्हां येतो ).

**चाकरः**—रावसाब, त्यो गिरस्त जागचा हालेना बगा ! त्यो तर पटा पटा पायां पडूनशान म्हंगतो कसय करून मालकाकन योक रुपया तरी ध्येऊनशान या.

**रंगः०**—मूर्ख आहेस तूं. चल जा. नीघ येथून. ( चाकर मुजरा करून जातो. ) काय करावं ! बाळासाहेबाच्या पैशावर मला हें वैभव प्राप्त झालें आणि मी त्याला रुपया आठ आणे देऊं नये ? पण करायचं कसं ? सातआठ वेळां त्याला पैसे दिले तर तो आतां रोज रोज येऊं लागला. बरं, ते तरी पैसे तो चांगल्या कामाकरितां नेतो आहे का ? हातांत पैसे पडण्याचा उशीर, कीं चालली स्वारी दारूच्या गुत्त्याकडे ! बरं, इतकें असूनही मी त्याला पैसे दिले असते पण त्याच्या मनाला निःसंशय वाटत असलें पाहिजे कीं ह्यानें आपल्याला मदत करावी हा आपला हक्कच आहे. ( चाकर पुनः येतो. )

**चाकरः**—रावसाब, त्यो मनुष्य आक्सी येड्यावानी करतूया बगा. दोघांतिघांनीं त्यासनी उचलूनशानच रस्त्यामंधीं न्येला. तरी तो परतूनश्यान आलाच बगा. त्यानं लोलनच घेतलिया बगा आपल्या दारीं.

**रंग०ः**—( कपाळाला आठ्या घालून ) जा. हे दोन रुपये त्याला नेऊन दे. आणि सांग आतां महिनाभर येऊं नको.

**चाकरः**—जी रावसाब.

[library stamp]

**रंग०**:—( विचार करून ) आपण ह्याच गांवांत येऊन राहिलों हा मूर्खपणा केला. एक तर मला हा गांव सोडून गेलें पाहिजे. नाहींतर बाळासाहेबाला आणि त्याच्या पक्षाच्या लोकांना कसा तरी हा गांव परका केला पाहिजे. ( इतक्यांत पिल्या आणि रंगरावाचा चाकर येऊन दाखल होतात. )

**चाकर**:—रावसाब, ह्या घटिंगणाला दहा वेळां मज्जाव बोललों बगा, तर हा धिंगामस्ती करूनशान येथवर आला.

**रंग०**:—( हसून ) तर मग ह्या मूठभर मूर्तीनें तुझ्यासारख्या धिप्पाड राक्षसालाही चीत केलं एकूण. ( रागानें ) चलो जाव गधा. ( चाकर जातो. ) ( आपल्याशीं ) मीं ह्याला गधा म्हटलें; पण मी ? माझी पहा कशी गाळण उडाली आहे ती ! ( उघड ) बरं पिलोबा, पुन्हा अशी दांडगाई केली तर मी गय करणार नाहीं. काय काम आहे बोल.

**पिल्या**:—मालकासनी तुम्हीं आज पैसे दिल्याती व्हय ?

**रंग०**:—होय, दोन रुपये दिले.

**पिल्या**:—आनि ते कां म्हनूनशान ?

**रंग**:—त्याला खायची अडचण होती म्हणून.

**पिल्या**:—कोण म्हंगतय ? मालकांनीं सांगितलं व्हय ?

**रंग**:—नाहीं, हा माझाच तर्क आहे.

**पिल्या**:—ह्यो कागद बगा बरं ?

**रंग**:—( कागद वाचतो व तो वाचीत असतां लज्जा, आश्चर्य यांचा आविर्भाव करतो ) काय पिलोबा ! तुम्ही तीन हजार रुपयांचें शेत आपल्या नांवावर घेऊन रंगरावाला ह्या कागदांत लिहिलेल्या शर्तीवर करून दिलें ? दोन हजार रुपये कोठून आले हें मला ठाऊक आहे, पण तुमच्यासारख्या गरिबानें हे हजार रुपये कोठून आणिले ?

**पिल्या**:—ह्ये म्या मालकाचे मालकासनी परत दिले बगा. त्यांनींच खुशींत येऊनशान मला जितकी बक्षीस दिल्हीं, तितकी समदी मिळूनशान ह्यो हजार रुपये झालेती बगा !

**रंग०**:—आणि तुम्हीं आपल्या मुलामाणसांना कांहीं ठेवलं नाहीं!

**पिल्या**:—हां ठेवलय् तर? चांगलें धणधाकट हातपाय आन चोखट मन, देवाचं भय आन पारमानिक मन! ह्यो बस्स नाहीं काय?

**रंग०**:—( उसासा टाकून तटस्थ होऊन त्याच्याकडे पाहतो. ) काय, काय पिलोबा, तूं महासाधु आहेस ! पिलोबा.—

**पिल्या**:—असं ह्या गुलचाट भासनान मालकापरमान पिल्याबी फसल व्हय ? आणि ह्यो शेत तुम्हांसनी फुकटावारी गवसल व्हय ? चला राव ! आतां पुनः मालकाला एक दमडी देऊं नका. त्यासनीं का तुम्ही दारूबाज बनवणार आतां इतकें करूनशान वरती ?

**रंग०**:—नाहीं रे बाबा. मला ठाऊक नव्हतं तूं त्यांचं पोषण करीत आहेस हें.

**पिल्या**:—ठाऊक नव्हतं ? काय म्हंगता राव ? आनी तुम्ही त्वंड काळं करूनशान इलायतेंत गेलां, त्यवा तुम्हांकन म्या दोन हजार रुपये कशाला नेले ते.

**रंग०**:—होय, तेव्हां तूं म्हणाला होतास, कीं ह्या दोन हजार रुपयांवर मी पुढें अण्णासाहेबांचें साह्य करीन. मला चांगलं आठवतं तें.

**पिल्या**:—बरं, बलीसटरसाब, येत्यो मी. ह्या पुढं मालकासनी दारू प्यायला पैसा द्यायचो नाहीं समजलाना ?

**रंग०**:—बरं.

**पिल्या**:—आनखी योकच शब्द बगा.

**रंग०**:—बोल बोल, तूं रोज येऊन चार चार घंटे बोलत बसलास तरी हरकत नाहीं.

पिल्या:—( हंसून ) असल्या च्वोरासंग आन ह्यो पिल्या भासन करणार! बलीसटर हो नाय तर राजा हो, तुला मी चोरच म्हननार. जा मला फांशी दे जा. पर ह्यो बग, ह्या पिल्याचा शब्द ध्यानांत धरूनशान ठ्येव. योक दीस तुझी दशा अन्नासायबापेक्षां आन बाळासायबापेक्षां पण खराब होईल ! ( जातो. )

रंग०:—( एकदम ) पिल्या, पिलोबा, अरे थांब, असा रागावून जाऊं नको. ( त्याच्यामागें जातो. )

———

( पिल्याच्या घरांत बाळासाहेब बेशुद्ध पडला आहे. त्याच्याकडे पाहून )

पिल्या:—ह्यो समदा पराकरम पैशाचा—दादा पैशाचा !

चाल—" अंकित पदांबुजांची दासी–"

लइ लइ वंगल दादा रे पैसा
लइ वंगल
वंगल दादा पैसा रे
वंगल दादा रे पैसा
लइ लइ वंगल दादा रे पैसा
लइ वंगल
ह्या पैशानें तुला पाजिला घ्वोट इसाचा जैसा रे
वंगल दादा पैसा
ह्यो बघ वंगल दादा रे पैसा
लइ लइ वंगल दादा रे पैसा
लइ वंगल
ह्या पैशानें तुझाच केला येसनवाला म्हैसा रे
वंगल दादा पैसा
ह्यो बघ वंगल दादा रे पैसा

लइ लइ वंगल दादा रे पैसा
लइ वंगल
ग्येला पैसा समदं घेउनशान
ग्येल मढ तूं तैसा रे
वंगल दादा पैसा
ह्यो बघ वंगल दादा रे पैसा
लइ लइ वंगल दादा रे पैसा
लइ वंगल
वंगल दादा पैसा रे
वंगल दादा पैसा
लइ लइ वंगल दादा रे पैसा
लइ वंगल

( कपाळावर हात मारून ) घर ग्येलं दार ग्येलं पैसा, ग्येला, अबरु ग्येली आन बाबा आतां सरीराची बी वाट लावतुया बगा. घेवा, धाव तूं आतां. माझ्या बाच्यानं ह्यासनी सुधीवर आनवत नाय ! ( बाळासाहेबास हालवून ) धनीसाब, उठाना आतां ! ( बाळासाहेब मोठ्यानें रेंकून ह्या कुशीचा त्या कुशीवर होतो. ) मरा बाबा ! इथं कोन काय करनार ? पण यासनी दारू प्यायला पैसे कोण देतुया. ह्यो पाहिला पाहिजे. ह्यो तो चोर रंगराव असला पाहिजे बगा. गाढीच्यान इतका सत्यनास क्येला ह्यो पुरा नाय झाला. आतां गाढीचा मालकासनी दारुबाज कराया लागला हाय. बरं म्हंगावं ह्यो पिल्या हाय आन तूं हैशी ! बलीसटर झालाया, बेटा बलीसटर ! पर ह्यो पिल्या तुझ्या बलीसटरच्या बी तोंडावर खेटर हानतुया बग आतां. ( जातो. )

बाळा०:—(पडल्या पडल्या) पिलोबा, ए पिलोबा, पिल्या, हो.

पिल्या:—( परत येऊन ) जी धनीसाब.

**बाळा०**:—( उठून बसून ) मी चांगला शुद्धीवर आलों आहे. पिलोबा, तुमचं सारं बोलणं ऐकून घ्यावं म्हणून तसाच निजून राहिलों होतों.

**पिल्या**:—सूध, सूध कशाची आतां मालक, (डोळे पुसून रडक्या स्वरानें ) एकदां दारूची ज्यासनी चटक लागलीया त्यो समद्या जलमामंधीं सुधीवर येत नाय बगा. काय बोलूं धनीसाब, ह्यो एवढं सोडून द्याल तर ह्यो पिल्या ह्यो शीर कापूनशान मागत्याल तर त्येबी ह्या पायांपुढं ठ्येवील.

**बाळा०**:—( मोठ्या आवेशानें उठून पिल्याला मिठी मारतो. ) पिल्या, या क्षणापासून मी तुझा धाकटा भाऊ आहे आणि तूं माझा वडील भाऊ ! मला धनीसाब म्हणावयाचं नाहीं. भाऊ म्हण आणि मी दादा म्हणेन. मी दारूला ह्यापुढें शिवणार नाहीं, तरी तिचा जुलूम कांहीं विलक्षण आहे. मला जर कधीं मोह पडलाच तर तूं खुशाल मला मारलंस तरी मी कांहीं म्हणणार नाहीं. माझी खात्री आहे, कीं दारूच्या अंमलांतसुद्धां मी तुझें ऐकेन.

**पिल्या**:—ह्यो समधं ब्येस हाय, आन चाकर झालों तरी मी धनीसाबाच्या बऱ्यासाठीं हात उचलायला बी कमी करणार नाहीं. पर माझ्यासारख्या चाकरमाणसांसनीं दादा सिंदा म्हणूं नका धनीसाब, मी हात जोडुनशान सांगतों बगा.

**बाळा०**:—बरोबर आहे. तुझी योग्यता भावापेक्षांही जास्त आहे. द्रव्यलोभानें बापलेकांमध्यें वितुष्ट येतें, भाऊ भाऊ एकमेकांचे उरावर बसतात, तेव्हां त्यांच्या वर्गांत तुला ढकलावें हें देखील शहाणपण नाहीं. मला जर भाऊ असता तर तो खात्रीनें मीं असे गुण उधळल्यावर माझा हाडवैरी होता. पण तूं माझा सारा त्रास सोसून, आपल्या मुलाबाळांच्या तोंडचा घांस काढून मला पोशीत आहेस. माझा लोभानें वेडा झालेला बाप मला माझ्या अपराधाची

नगर वाचनालय सातारा
संग... ...कृत



बाळा०:--( मोठ्या आवेशानें उठून पिल्याला मिठी मारतो. ) [ पृ. ४४

कदापि क्षमा करणार नाहीं; पण तूं पहिल्यापासून क्षमेचा निधिच मला मिळाला आहेस. त्या तुला निरिच्छ बुद्धीनें मजवर प्रेम करणाराला मीं कोणतें नांव द्यावें? तूंच सांग. काय म्हणूं मी तुला ?

**पिल्याः**——आपुन धनीसाब आणि मी पिल्या इतकंच बस हाय बगा. बरं धनीसाब, फिरूनशान किर्पा करून मी क्येलं त्याचं नांव काहूं नका बगा. मीं काय केलंया. ह्या पायांपुन जें मिळालें त्येंच पुना ह्या पायांसनी परत केलं.

**बाळा०**:——काय ते तीन हजार रुपये मीं तुला दिले आणि कधीं? त्यांतले दोन हजार तूंच त्या वाघाच्या घशांतून काढलेस. आणि एक हजार ते तुझेच जन्मभर कष्ट करून मिळविलेले.

**पिल्याः**——वा! धनीसाब, ह्यो हिसोब तर लई चोख केल्याती. त्ये दोन हजार रुपये माझ्याच बाचे त्या वाघानं गिळले व्हते काय? अन ते हजार पन माझ्या बाच्या घरांतून निघाले असतील नाय कां ? जाऊं द्या त्या गोष्टी. माझ्या धरमापरमान मी चालत हाय बगा, ह्यांत कायबी अधिक नाय.

**बाळा०**:——काय ! ह्याचंही तुला कांहीं वाटत नाहीं एकूण——

चाल——"भूपती खरे ते—"

त्वां विद्यावंता लाजविलें धनवंता ।
त्वां लाजविलें रे गुणवंता कुलवंता ।।
जे ब्रह्मज्ञाना पढले तेही पडले ।
ह्या षड्रिपुपुढती किती जरी धडपडले
निष्काम अशी ही प्रीति ।। ह्या जगीं ।।
ही अयत्नलब्ध सुनीती ।। ह्या जगीं ।।
ही सरळ सुनिर्मळवृत्ती ।। ह्या जगीं ।।
अतिदुर्मिळ, केवळ प्राप्य महंता संता ।
जे सदा वाहिले कैवल्या ।। भगवंता ।। १ ।।

हे महासत्पुरुषा, तुझ्या सहवासानें मी सारीं सारीं दुःखें विसरलों. मी द्रव्यमदानें आपल्या वडिलांचा छळ केला, मला व्यवहारज्ञान नसल्यामुळें आणि तें नसूनही आपण मोठे शहाणे ही घमेंडी बाळगल्यानें लबाड, तोंडपुज्या लोकांच्या तावडींत सांपडून दुर्व्यसनी झालों, भिकेस लागलों. ही श्रीमंती माझ्या सुखाच्या, अन्नाच्या, माझ्या कुलाच्या व शेवटीं माझ्या शरीराच्या नाशाला कारणीभूत झाली, तरी हें झालें हें सारें बरेंच झालें. कारण, ह्याच्या योगानें तुझें खरें, सुनिर्मळ स्वरूप मला समजलें. मला एका अगम्य सत्पुरुषाचा संग घडला. पिलोबा, मला मार्गाला लावा. मी आपल्या अर्ध्या वचनांत राहीन. ( त्याचे पाय धरतो ).

**पिल्याः**—(पाय काढून घेऊन) छत्, ह्ये येडयावानी काय असं करतां धनीसाब ? ध्येवाला भिवूनशान वागा. मग समदं अजूनशान नीट होईल. पहिल्यानदा ही दारू अक्सी सोडून द्या बगा. आणि दुसरी गोष्ट अण्णासाहेबांसनी भेटूनशान त्यांचे एकदम पाय धरा.

**बाळा०**:—ठीक आहे. चल तर आतांच्या आतां माझ्याबरोबर. आतां जाऊन मी त्यांचे पाय धरतों.

**पिल्याः**—लय बेस है, चला. ( दोघे जातात. )

( सुमित्ररावाचें घर. )

**सुमित्र०**:—( आत्मगत ) रघुवंशांतील पुरुषांच्या आयुष्यक्रमाचें कालिदासानें जें वर्णन केलें आहे त्याची आज मला आठवण होतेः—

**शैशवे कृतविद्यानां यौवने गृहमेधिनाम्**
**वार्धक्ये मुनिवृत्तीनां योगेनान्ते तनुत्यजाम् ॥**

खरोखरच—

**चाल—**"साध्य नसे मुनि कन्या—"

**धन्य पुरुष तो झाला ॥ जगतीं ।**
**ह्यापरि खचीं जो जन्मला ॥ ध्रु० ॥**

बाळपणीं विद्यार्जन केलें ।
गृहधर्मी तारुण्यहि गेलें ।
मुनिवृत्ती वार्धक्यीं
अंतीं योगें त्यजि देहाला ॥ १ ॥

आणखी—

दिंडी

ऋण न कोणाचें शत्रु कुणी नाहीं ॥
प्रेम विश्वीं व्यापलें सदा पाही ॥
पुढें ईश्वर मानसीं तोच राही ॥
स्थिती ज्याची ही स्वर्ग धरा त्या ही ॥ १ ॥

हे प्रेमसागरा, ईश्वरा, ह्या दासानुदासावर तुझा केवढा हा अनुग्रह म्हणावा, कीं बाळपणीं तूं मला दरिद्रावस्थेंत ठेवलेंस ! मला तूं ऐहिक संपत्ति दिली नाहींस म्हणूनच मला स्वावलंबन, विचारस्वातंत्र्य, दीर्घोद्योगिता, समाधानवृत्ति इत्यादि गुणांची खरी संपत्ति प्राप्त झाली. परमेश्वरा, ह्या दुसऱ्या संपत्तीनेंच मला खऱ्या अविनाशी सुखाला योग्य केलें. हे ज्ञानकंदा, तुझ्या योजनांचा अर्थ समजून त्यांचा उपयोग करून घेण्याचें सामर्थ्य तूं प्रत्येक मनुष्याला दे. हे प्रेमनिधाना, तूं ज्या स्थितींत ठेवशील तीच स्थिति खरोखर उत्तम आहे. ( थोडा वेळ थांबून ) झाला, आपला विचार कायमचा झाला. एक अडचण होती, पण तीही दूर झाली. पतीवर सर्व हक्क आपला ! ईश्वराचा, ज्या राष्ट्रांतला तो असेल त्या राष्ट्राचा, समाजाचा, कोणाचा-कोणाचा त्याच्यावर तिळमात्र हक्क नाहीं, असें समजणाऱ्या स्त्रिया घरोघर आहेत आणि तें बरोबर आहे; कारण, पतिव्रतेचें सर्वस्व पतिच असतो; पण, असें असूनही जी पत्नी इतर सर्वांचे हक्क ओळखून आपल्या पतीला व्यक्तीची, समाजाची, राष्ट्राची, देवाची सेवा करूं देते, किंबहुना त्याच्या हातून ही सेवा पूर्णपणें घडावी म्हणून

त्याचा वियोग देखील सहन करावयाला तयार होते, ती केवढी धन्य, किती उदारमनाची म्हणावयाची! माझ्या पत्नीनें परवां मला जें उत्तर दिलें तें आपल्या देशांतल्या प्रत्येक पत्नीनें तोंडपाठ करण्यासारखें आहे.

चाल--" अरसिक किति हा शेला--"

यावें, लोभ असावा, जा, होवो
अपणा ईश्वरसेवा ॥ ध्रु० ॥
वियोग माझ्या जीवा । किती दुःसह
होइल मजला ठावा ॥ १ ॥
मम देशा, मम देवा, घ्या, देतें
घ्या ! मत्प्राणविसांवा ॥ २ ॥
सौभाग्याचा ठेवा । हा माझा आतां
सांभाळावा ॥ ३ ॥

आणखी ती काय म्हणाली बरं? हो हो! मी विसरेन कसा तें?

चाल--"शैवालें युक्त जैसें--"

सत्कार्यी राहिलेलें वय अपुलें जाउं द्या ।
संस्कृतीचा कळस नेत्रीं जगताला पाहुं द्या ।
नच मर्त्यी परि अमर्त्यी निज दृष्टी राहुं द्या ।
माझी जी प्रीति पायीं फळ तिजला येउं द्या ॥ १ ॥

ही वीरपत्नी खरी! मी गेलों तरी हें स्त्रीरत्न माझ्या हस्तकंडांतून हालणार नाहीं! ( पुढें पाहून ) अरे, हे कोण येत आहेत इकडे! गुरुजी दिसतात. पण त्यांच्याबरोबर हातांत हात घालून हा कुणबटासारखा पोशाख केलेला कोण दिसतो आहे हा! हं! आलं लक्षांत. हा पिल्या असावा. ज्याच्या स्वामिभक्तीनें,

प्रामाणिकपणानें, औदार्यानें, निष्काम प्रेमानें बाळासाहेबांसारख्या नीतिभ्रष्टाला पुन्हां सुमार्गाला लाविलें, अण्णासाहेबांचा क्रोधाग्नि विझवून त्यांना शुद्धीवर आणिलें, रंगरावासारख्या हृदयहीन वंचकाला पश्चात्तापानें अन्न गोड लागूं दिलें नाहीं, तोच हा अक्षरशत्रु परंतु गुरुजींसारख्या महापंडिताला मान्य झालेला पिलोबा वाघमारे. सांगा आतां, धन मोठें, ज्ञान मोठें, कां शील मोठें ? अरे वा ! हे सगळेच इकडे येत आहेत, चला आपण ह्यांना सामोरे जाऊं. ( तसं करतो. गुरुजींला नमस्कार करतो. अण्णासाहेबाला आलिंगन देतो, पिलोबाला आलिंगन देतो. बाळासाहेब, रंगराव, वसंतराव, श्रीकृष्णशास्त्री वगैरेंस नुसतें हातानें या म्हणतो. ) [येथें नाटकांतील सर्व पात्रें यावीं.] ( सर्वांस बसवितो. मुख्य स्थानीं गुरुजी, त्यांच्या उजव्या हाताकडे पिलोबा, डावीकडे सुमित्र, त्याच्याजवळ अण्णासाहेब, बाळासाहेब, पिलोबाच्याजवळ रंगराव वगैरे इतर पात्रें याप्रमाणें बसतात. )

**सुमित्र०**:—अण्णा, आतां प्रकृति बरी आहे ना ?

**अण्णा०**:—बरी आहे. ( पिलोबाकडे हात दाखवून ) ह्या सत्पुरुषाच्या आणि आपल्या आशीर्वादानें.

**पिलोबा**:—( मोठ्यानें हंसून ) ह्यो बगा मालक ह्या पिल्यासनी पागल बनवणार आपून पागल ! सप्तरस म्हणजे कश्यासंगती खातात ह्यो पन ह्या पिल्यासनी उमगेना ! आन म्हणे पिल्या सप्तरस ! हाय का नाय समदी मजा !

**रंग०**:—पिलोबा, तुम्हांला अर्थ न समजला म्हणून काय झालं ? तुमच्यासारख्या महात्म्यावांचून हे असले परस्परांचे हाडवैरी पुन्हां परममित्र कोणाच्यानें करवले असते कां ? निदान मी तरी कदापि शुद्धीवर आलों नसतों.

**गुरु०**:—रंगराव, तुम्ही जेव्हां अण्णासाहेबांना दहा हजार

रुपये रोख व दहा हजारांचा कर्जरोखा लिहून दिला, तेव्हांच तसं ठरलं नव्हतं का, कीं पुन्हां म्हणून झाल्या गोष्टींचा उच्चार करावयाचा नाहीं.

**कृष्ण०**:—तेंच जे आहेत्ते बरें.

**वसंत०**:—तरी पण चौघडी—

**कृष्ण०**:—( नाकावर बोट ठेवून चूप रहा म्हणून खुणावतो. )

**गुरु०**:—हें चौघडीचें प्रकरण काय आहे तें नव्हतं कळलं.

**कृष्ण०**:—त्यांत कांहीं जे आहेत्ते अर्थ नाहीं.

**रंग०**:—तें न निघालं तरच चांगलं.

**सुमित्र०**:—जाऊं द्या तें, पण आपण सर्वांनीं आज माझ्या घरीं पायधूळ कां झाडली हें समजत नाहीं.

**अण्णा०**:—आम्हीं ऐकलं तुम्ही संन्यास घेणार, म्हणून आपली गृहस्थाश्रमामध्यें शेवटची भेट घ्यायला आलों.

**गुरु०**:—पण, अण्णा, तूं तर मागेंच संन्यास घ्यायला निघाला होतास. आठवतं कां तुला ?

**अण्णा०**:—आठवत नाहीं. ( बाळासाहेबाकडे बोट दाखवून ) हा पोरगा माझी उरलेली इस्टेट नीट संभाळील अशी माझ्या मनाची पक्की खात्री होईपर्यंत मला घर सुटत नाहीं. सुमित्राची गोष्ट निराळी आहे.

**साकी.**

**गृहराज्याची शूर धुरंधर समर्थ राज्ञी भार्या ॥**
**आज्ञाधारक सुशील पुत्रक दक्ष सदा सत्कार्या ॥**
**तो नर मुक्त, जरी । असला रमला संसारी ॥**

**गुरु०**:—अण्णा, तूंच सांग आतां यावरून आपल्या बाळपणाच्या वादाचा निकाल आतां लागला खरा ना ? सांग पाहूं धन मोठें, का ज्ञान मोठें, का शील मोठें !

**अण्णा०**:—( त्याच्याबरोबर सर्व ) शील मोठें, शील मोठें.

**पिल्या०**:—शील म्हणजे काय ?

**गुरु०**:—शील म्हणजे काय हें देखील ठाऊक नसतां जें तुमच्या ठायीं आहे तें.

**गुरु०**:—अण्णा, सुमित्राचा पक्का विचार झाला आहे बरं का? आणि वहिनींचं पण अनुमोदन मिळालं आहे. सुमित्र संन्यास घेणार ! पण संन्यास म्हणजे जगाचा त्याग मात्र नव्हे.

**सुमित्र०**:—खरोखर नव्हे. संन्यास म्हणजे विश्वकुटुंबी होऊन ईश्वराची सेवा करणें.

**अण्णा०**:—( मान डोलावून ) आपल्याला बोवा ह्याचा कांहीं अर्थ समजत नाहीं.

**सुमित्र०**:—मी सांगतों तुला अर्थ. मी आतां मनापासून असें म्हणणारः —

चाल—" नृपममता रामावरती—"

यापुढें प्रभू तूं माझा । प्रिय बंधु स्वामी राजा
यापुढें ।। ध्रु० ।।
तव सेवा हें मम अन्न । तव चिंतन हें मम
शयन । यापुढें ।।
तव नामाचा मधु घोष । हा माझा श्वासोच्छ्वास ।
यापुढें ।।
हीं दृष्टि जगाला विटवी
तुझ्या पदीं जडावि
प्रभू तूं माझा । प्रिय बंधु स्वामी राजा ।
यापुढें ।। १ ।।
तुजसाटीं मी संसारी । तुजसाटीं कर्में सारीं ।
यापुढें ।।

तुजसाठीं वसती देहीं । तुजसाठीं दिशा ह्या दाही ।
यापुढें ॥
हें स्वत्व अर्पिलें घेई ।
एवढें देई ।
प्रभू तूं माझा । प्रिय बंधु स्वामी राजा ॥
यापुढें ॥ २ ॥
मम विचार तूं मम उक्ती । तूं युक्ती भुक्ती
मुक्ती । यापुढें ॥
मी तूं हें भावन नुसतें । प्रेमास्तव गोड मनातें ।
यापुढें ॥
मी मुक्त सुखी मी शांत
सदा स्वर्गात ।
प्रभू तूं माझा । प्रिय बंधु स्वामी राजा ।
यापुढें ॥ ३ ॥

**गुरु०**:—( चारुदत्त व देवदत्त ह्यांना येतांना पाहून त्यांच्याकडे हात करून ) हे पहा ते आधारस्तंभ, ज्यांच्या आधारामुळें सुमित्र हा असा संसारविनिर्मुक्त झाला. ( चारुदत्त व देवदत्त येऊन प्रथम गुरुजींच्या व मग बापाच्या पायांवर डोकीं ठेवतात व दोघे त्यांना तुमचें कल्याण असो असा आशीर्वाद देतात. नंतर ते अण्णासाहेब, पिलोबा ह्यांच्यापासून आरंभ करून सर्वांस नमस्कार करतात व बापाजवळ जाऊन अदबीनें उभे रहातात. ) बाळांनो, तुम्ही आलां बरं झालं.

**अण्णा०**:—( लडिवाळपणानें चारुदत्ताला जवळ ओढून ) हे तर आमचे जावईबुवा ! असे लाजतां कां ? असे जवळ या. रुसूं नका. काय बाळ्या ? तूंच सांग ह्यांना रुसण्याचें कांहीं कारण आहे कां ?

[stamp] वाचनालय, सातारा.

सुमित्र०:—पण ?

अण्णा०:—पणबीण कांहीं नाहीं.

गुरु०:—नकोच पणबीण ? कां रंगराव ?

रंग०:—खरंच नको; माझी बहीण देवनंदा आणि देवदत्त यांचें आणि बाळासाहेबांची बहीण सुशीला आणि चारुदत्त यांचीं लग्नें कधींच ठरलीं आहेत. मी त्यांनाच विचारतों, कीं तुमचे वाग्-निश्चय झाले आहेत कीं नाहीं ? ( चारुदत्त व देवदत्त लाजून खालीं माना घालतात. )

गुरु०:—सुमित्रा, आतां नाहीं म्हणूं नको. ही ईश्वरी योजना दिसते.

अण्णा०:—आणि ही योजना सिद्धीस जाणार. पण सुमित्रा, तुझा संन्यास घेण्याचा विचार चारुदत्ताला आणि देवदत्ताला पसंत आहे कां ?

सुमित्र०:—तेच सांगतील. सांग चारुदत्ता, मी आतां घेऊं ना संन्यास ?

चारु०:—( हात जोडून ).

चाल—"कहेना सब पोरे जान–"

सर्व वांच्छा सर्व चिंता सोडा ओढा पूर्ण हीच
अशी विनती । मुक्ती ।। ध्रु० ।।
माझ्या शिरीं हो भार सर्व ठेवा आतां ।
पूर्ण शांतिचा अनुभव घ्यावा परम सुखद यापुढतीं ताता।
अभिष्ट जें या पदांप्रति तें करीन पहा पुरें ।
ईश्वरीं परात्परीं ।
विलीन होऊं द्या मती ।। १ ।।

गुरु०:—शाबास, हा म्हणावा सत्पुत्र. चला, आपण

५४
रि ७५ ना ५८



ज्याच्या अनुग्रहानें मनुष्याच्या संसाराचा असा उत्तम शेवट होतो त्या परमेश्वराचें स्तवन करूं:—

चाल—ब्यांडची.

जय जगदीशा करुणागारा, सर्वसमर्था संस्कृतिसारा ।
जयजय विमला सुखनिकरा । विनतजनप्रतिपाल-
करा ।। १ ।।

घे घे देवा । अनुदिन सेवा
दे इतुक्या दे सुखद वरा ।
पथ मुक्तीचा हाच खरा ।। ध्रु० ।।
जें होईल तें तुजला अर्पूं, मनिं जनिं
विजनीं तुज संतर्पूं
हेतु करीं हा मात्र पुरा । नच दाता मागूं
इतरा ।। २ ।।
तुजला भ्यावें तुजला ध्यावें प्रेमनिधाना तुज
पूजावें ।
नित्य अनन्या भ्रांतिहरा । भाव नसावा
मनिं दुसरा ।। ३ ।।
संधि असो जगिं शांति असो । विग्रहलव
कोठेंहि नसो ।
तव इच्छेला मान्य धरा । होवो दे सुख
नारिनरां ।। ४ ।।

समाप्त

सातारा.
६६६३
ना ५८
५-५८